# रसराज

१९९३-९४



## दोन दशकांची वाटचाल

शिक्षण विकास मंडळ
देवगड

१९७४-१९९४

**श्री. स. ह. केळकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देवगड (सिंधुदुर्ग)**

# निरोप



प्राचार्यांसमवेत तृतीय
वर्ष कला विद्यार्थी

प्राचार्यांसमवेत तृतीय
वर्ष वाणिज्य विद्यार्थी





प्राचार्यांसमवेत तृतीय
वर्ष विज्ञान विद्यार्थी



# रसराज

वार्षिक अंक १४ वा

१९९३-९४

संपादक मंडळ

प्राचार्य श्री. बी. एन्. भोसले / अध्यक्ष

प्रा. लता वळसंगकर / कार्यकारी संपादक

सहाय्यक संपादक

प्रा. महेंद्र कामत

प्रा. मंगेश जांबळे

प्रा. रमाकांत शिंदे

शिक्षण विकास मंडळ, देवगड

१९७४ १९९४

श्री. स. ह. केळकर
कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय

# अंतरंग

## मराठी


| | | |
|---|---|---|
| पायगुण | पुष्पलता इळकर | १ |
| विकसनशील भारताचे प्रणेते जे. आर. डी. टाटा | शिल्पा सोमण | ३ |
| संगत | मंगल हिंदळेकर | ५ |
| डंकेल प्रस्ताव व भारतीय कृषी क्षेत्र | विश्वामित्र खडपकर | ८ |
| ओळख वैदिक गणिताची | मेघाली लोंबर | १० |
| या जन्मावर . . . या जगण्यावर . . . | संगीता सारंग | १३ |
| रवीन्द्रनाथ टागोर - एक सहज सुंदर व्यक्तिमत्त्व | मनीषा करंदीकर | १५ |
| वारस | समीर जाधव | १७ |
| दुसऱ्याचे मन वाचता आले तर! | रंजीता खडपे | १९ |
| टिश्श्यू कल्चर | किशोर नाईक | २१ |
| परिवर्तन | सरिता गोगटे | २३ |
| भटकंती किल्ल्यांची | मंगल बोडस | २५ |
| आधुनिक महाराष्ट्राचे समाजवादी संत - साने गुरुजी | संध्याराणी नांदगावकर | २८ |
| विजयदुर्गचे श्रमशिबीर | सीमा नोडकर | ३० |
| विज्ञानयुगात आध्यात्माचे महत्त्व | मीना दातार | ३१ |


## कविता


**एक अश्रू** - सुरेश कदम / **अनपेक्षित** - विठू प्रभू / **[illegible]डलेस तू उमलते फूल** - मंगल हिंदळेकर / **फुलांचे झाले अश्रू** - संदीप डोळकर / **खेळ नियतीचा** - प्रफुल्ल राणे / **शांततेचा दूत** - सहदेव कदम **लेणं** - हिरेश परब / **तराजू** - आनंद कदम / **पापपुण्य** - सचिन हर्याण / **ज्ञानमंदिर** - स्वाती कर्णिक / **मर्यादा नसते** - नितीन जाधव / **स्वप्न** - सरिता [illegible] / **सर पावसाळी** - विभावरी बांदेकर / **आनंद नाद** - मंगेश जाधव / **अभंग** - [illegible]ना कुळये / **पुकारला सप रस्त्यांनी** - संगीता कुबल / **नजरानजर** - सुरेश तेली / **मीलन** - सीमा पवार / **अभिमान** - मनीषा करंदीकर / **विरह** - सुचिता बांदकर / **दूर तो किनारा** - संदीप जाधव / **काळीज** - विजय कांबळे / **होडी** - प्रकाश सपकाळ / **फुलणारे क्षण** - श्रीराम पळसुले / **नाही भाकरी** - समीर जाधव / **कळी** - अरविंद दळवी / **आकांक्षा** - विजय तिर्लोटकर / **तू** - विजया नारिंग्रेकर / **संसार** - संदीप डोळकर/ **हिमालय का बडप्पन** - रंजीता खडपे / **तेरी मेरी कहानी** - मनीषा भुजबळ / **जन्म** - विद्यागौरी ओगले / **निसर्ग** - [illegible] सावंत

# ENGLISH

## PROSE


| | | |
|---|---|---|
| **Importance of English in India** | Suresh Kadam | 45 |
| **Indian Film Industry** | Suresh Teli | 47 |
| **Cast Differences in India** | Poonam Rane | 49 |
| **A Little About Indian Woman** | Shweta Wadekar | 50 |
| **God Created Man, But . . .** | Sushma Yeram | 52 |
| **India's Heroic Victory** | Kedar Lombar | 54 |
| **Historical Evolution of Computer** | Anand Gokhale | 56 |
| **Packing Science** | Tanuja Bhogate | 59 |
| **Chemistry of Love** | Vandana Sawant | 61 |
| **Flying World in Deogad** | Smita Nalawade | 62 |


## Poetry


| | | |
|---|---|---|
| **Friendship** | Vaishali Joil | |
| **Love** | Sahadev Kadam | |
| **You !!!** | Vibhavari Bandekar | |
| **They Said** | Shweta Wadekar | |
| **Presence** | Suresh Kadam | |
| **Parting** | Sushma Yeram | |
| **Sometimes I Think** | Ashwini Velankar | |
| **Education and We** | Dattatray Satwalekar | |

# TWO DECADES : AN OVERVIEW

This year, we are in twenties. A span of two decades is surely not a prolonged period for an educational institution for it's emergence as a fullfledged developed Institution.

Shikshan Vikas Mandal - an educational institution established with a commitment of making available the avenues of the higher education, started Devgad college of Arts & Commerce which later on christened as Shri S. H. Kelkar college of Arts, Commerce & Science, with the modest strength of 85 students, in the year 1974. It had been indeed a reduculous idea, and many thought so, to have a college at a remote place like Devgad, that time. In contrast, soon, the college acquired the distinction of being reputed in the District. In the process, it produced nearely a thousand graduates of Arts, Commerce & Science. Despite all odds, the college showed an upward trend - both quantitatively and qualitatively. This is evident from the fact that some students appeared in the merit list of Board/University examinations, some even topped in the University.

Until 1988, it was a bifaculty college, but by realising the significance of the Science education and also the need of the region, in 1988-89, opened the Science wing and as a natural growth only recently i. e. in 1992-93 it emerged as a fullfledged Arts, Commerce and Science College second in the District. Last year, the college sent out the first batch of Science graduates. Opening the Post-graduate study centre in the college has reached yet another landmark. From this year (1993-94), we have started, to begin with, offering post graduation in the subject of Rural Development.

This expansion has been certainly the result of Sanstha's conscious efforts to extend the facilities of higher education and make it accessible and affordable to all sections of the Society - a social commitment with which it established. An educational institution owes much to the society and the region to which it belongs. In this context, therefore, it will be failing exercise if it does spare any effort to rise upto the expectations and to fulfil the aspirations of the people of the region.

Though it is for the others to judge the performance, it is pertinent to note that, by all standards, we have achieved a substantial progress besides every hardship. However, we are aware that present facilities / infrastructure is not adequate and needs a lot to be done. Able guidance and encouragement from the management, participation of all functionaries with great zeal and sincerity, made all this possible.

At present, the college has pictursque campus - Smt. Neerabai Jagannath Parkar Vidyanagari having spacious buildings, Laboratories, Computer section, staff quarters, hostel etc. We are now quite an enlarged family comprising of 75 employees and about 1250 students. A dream may be said to have come true.

Hopefully, we are ushering in the third decade and will assuredly strive for an overall development of the institution with even more pace, by employing ourselves resolutely and with determination so as to strengthen enough to sustain the challenges of the 21st century, which is just round the corner.

*Prin. B. N. Bhosale*

# संपादकीय

**रसिकहो,**

रसराजचा हा द्विदशकपूर्ती अंक. आमचं महाविद्यालय आता वीस वर्षांचं झालंय. महाविद्यालयाची इमारत, विद्यार्थीसंख्या, विविध ज्ञानशाखांचा विस्तार होत गेला तसा आमचा शैक्षणिक दर्जाही इथल्या आंब्याच्या मोहोराबरोबर सर्वदूर पसरला. महाविद्यालयाचा बारावीचा विद्यार्थी सचिन खाडिलकर आणि रूपाली गोडसे यांनी मिळविलेले अलौकिक यश म्हणजे आमचा ज्ञानवृक्ष योग्य पद्धतीने जोपासल्याची खूण आहे.

इथे विद्यार्थी घडवला जातो ते ज्ञानानं, विचारानं आणि मनानंही. म्हणूनच भूकंपग्रस्तांच्या वेदना विद्यार्थ्यांच्या काळजाला भिडतात तेव्हा केवळ मदत देऊन ते थांबत नाहीत तर मकरंद आणि मंगेश गोखले प्रत्यक्ष भूकंपग्रस्तांना सहाय्य करण्यासाठी मराठवाड्यात पोहोचतात देखील. यामागे केवळ कर्तव्यभावना असते म्हणून या जाण्याचीही कुठे प्रसिद्धी नाही, गवगवा नाही की गौरवाची भावना नाही.

या सर्वांचं प्रतिबिंब म्हणजेच हा अंक. विद्यार्थी सभोवताली डोळसपणे पाहतो आहे, काही अनुभवतो आहे, टिपतो आहे आणि भल्याबुऱ्याची जाण ठेवून शब्दबद्ध करतो आहे. हे शब्दबद्ध करणं सच्चेपणाचं आहे. म्हणूनच तंत्राची कसरत न करता शब्दातून भावना प्रकटू लागतात आणि त्याचाच एक आलेख बनतो. हा आलेख म्हणजेच आमच्या विद्यार्थ्यांचं आणि पर्यायानं महाविद्यालयाचं व्यक्तिमत्व आहे. हे व्यक्तिमत्व सुजाण असल्याची प्रचीती आपणालाही येईल.

आमच्या विद्यार्थ्यांनी नेहमीप्रमाणेच आमच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन सहकार्य केले त्याबद्दल त्यांना मनःपूर्वक धन्यवाद.

प्राचार्यांचे मार्गदर्शन, सर्व प्राध्यापक तसेच कर्मचारी वर्ग आणि विद्यार्थ्यांचे रसराजला वेळोवेळी सहकार्य लाभले आहे.

श्री मुरारी ऑफसेट प्रिंटर्स यांनी आपल्या सौंदर्यपूर्ण दृष्टीने आणि कुशल कामगार वर्गाच्या सहाय्याने हा अंक कलात्मक केला आहे. त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे आभार मानून 'रसराज' आपल्या हाती देत आहोत.

**संपादक**

## श्री. सदाशिव हरी केळकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देवगड

# शिक्षण विकास मंडळ, देवगड

### नियामक समिती

**श्री. शां. कृ. पंतवालावलकर**
अध्यक्ष
शिक्षण विकास मंडळ

**श्री. राजाभाऊ गो. मिराशी**
सभापती
नियामक समिती, शिक्षण विकास मंडळ

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अ. अ. नलावडे | उपाध्यक्ष |
| २) | श्री. स. ज. पारकर | उपाध्यक्ष |
| ३) | श्री. भा. गो. पाटणकर ( श्री. केळकर यांचे प्रतिनिधी ) | उपाध्यक्ष |
| ४) | श्री. स. भि. जामसंडेकर | कार्यवाह |
| ५) | श्री. रा. वि. कदम | सहकार्यवाह |
| ६) | श्री. य. ग. पोकळे | सहकार्यवाह |
| ७) | श्री. डॉ. अ. रा. खाडिलकर | कोषाध्यक्ष |
| ८) | श्री. द. बा. भिडे | सदस्य |
| ९) | श्री. ह. अ. नलावडे | सदस्य |
| १०) | श्री. डॉ. खं. ना. बोरफळकर | सदस्य |
| ११) | श्री. आ. गो. बांबुळकर | सदस्य |
| १२) | श्री. ना. बा. तेली | सदस्य |
| १३) | श्री. रा. धों. पारकर | सदस्य |
| १४) | श्री. शि. स. देसाई | सदस्य |
| १५) | श्री. म. ल. जोशी | सदस्य |
| १६) | श्री. ग. तु. साटम | सदस्य |
| १७) | श्री. ॲड. अ. म. माणगावकर | सदस्य |
| १८) | श्री. आ. के. बोंडाळे | सदस्य |
| १९) | श्री. ज. बा. कोयंडे | सदस्य |
| २०) | श्री. सु. मो. जोशी | सदस्य |
| २१) | श्री. रा. द. बिर्जे | सदस्य |
| २२) | श्री. रा. आ. कुलकर्णी (मा. बापूसाहेब पंतवालावलकर यांचे प्रतिनिधी ) | सदस्य |
| २३) | प्राचार्य बी. एन्. भोसले | निमंत्रित |
| २४) | प्राचार्या सौ. प. रा. राजेशिर्के | निमंत्रित |

## स्थानिक नियामक समिती

### वरिष्ठ महाविद्यालय

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. स. भि. जामसंडेकर | अध्यक्ष |
| २) | श्री. रा. गो. मिराशी | सदस्य |
| ३) | डॉ. अ. रा. खाडिलकर | सदस्य |
| ४) | श्री. भा. गो. पाटणकर | सदस्य |
| ५) | श्री. य. ग. पोकळे | सदस्य |
| ६) | डॉ. खं. ना. बोरफळकर | सदस्य |
| ७) | श्री. जी. टी. साटम | सदस्य |
| ८) | प्राचार्य बी. एन्. भोसले | कार्यवाह |
| ९) | प्रा. एस्. व्ही. केसरकर | प्राध्यापक प्रतिनिधी |
| १०) | प्रा. आर. एच्. पाटील | प्राध्यापक प्रतिनिधी |
| ११) | श्री. आर. एस्. नारकर | शिक्षकेतर कर्मचारी प्रतिनिधी |

### कनिष्ठ महाविद्यालय

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. स. भि. जामसंडेकर | अध्यक्ष |
| २) | डॉ. अ. रा. खाडिलकर | सदस्य |
| ३) | श्री. ह. अ. नलावडे | सदस्य |
| ४) | श्री. शि. स. देसाई | सदस्य |
| ५) | प्राचार्य बी. एन्. भोसले | कार्यवाह |
| ६) | प्रा. बी. एम्. माळी ( पर्यवेक्षक ) | सदस्य |

# आमचे स्फूर्तीस्थान



**मा. श्री. शां. कृ. तथा बापूसाहेब पंतवालावलकर** (करुणा कल्पतरु)
अध्यक्ष, शिक्षण विकास मंडळ, देवगड.

## मा. सभापती



**श्री. राजाभाऊ मिराशी**
नियामक समिती, शिक्षण विकास मंडळ, देवगड

## मा. कार्यवाह



**श्री. सत्यवान जामसंडेकर**
शिक्षण विकास मंडळ, देवगड

# आमचे प्राचार्य



बी. एन्. भोसले

## रसराज संपादक मंडळ



प्रा. जांबळे, प्रा. कामत, प्राचार्य, प्रा. वळसंगकर, प्रा. शिंदे

# अभिमान

## बारावी प्रथम श्रेणी प्राप्त



सचिन खाडिलकर
केंद्रात सर्वप्रथम



रुपाली गोडसे
कोल्हापूर विभागात दहावी



सुप्रिया म्हापसेकर



आशा ढोके



मंजिरी लळीत



मंजिरी भिडे



सुनिल पवार



भालचंद्र मणचेकर



अजय वेलणकर



अर्चना नाईक



सिद्‌धेश्वर मालवणकर



प्रशांत वारीक



मंदार लोंबर



उदय दळवी

# अभिमान

## बारावी प्रथम श्रेणी प्राप्त



दर्शन नार्वेकर



मंगेश जाधव



प्रसाद परब



अमोल मणचेकर



नुतन कुबडे



शिल्पा सोमण



मंजुषा सहस्त्रबुद्धे



नीता वझे



महेश भिडे



राकेश फाटक



प्रसाद जोशी



युसूफ खान

जनरल चॅम्पियन



सरिता गोगटे

जनरल चॅम्पियन



संतोष परब

# अभिमान

## तृतीय वर्ष प्रथम श्रेणी प्राप्त



पंडित बांदकर



दत्तगुरू भाबल



संजय कोळंबकर



रजनी पोसम



मनिषा नार्वेकर



मेधा गोगटे



वर्षा मुणगेकर



दीप गिरकर



विमल प्रभुमिराशी



रजनी टेंबे



दिनेश साटम

**जनरल चॅम्पियन**



अंजली मोंडकर

**आदर्श विद्यार्थी**



प्रसाद रानडे

**जनरल चॅम्पियन**



काशिनाथ कळंगुटकर

# रसराज संपादन सहाय्य


मंगेश जाधव


विभावरी बांदेकर


राजेश रांजम


राकेश पेडणेकर


रंजिता खडपे


वंदना मराठे


मृत्युंजय मुणगेकर



## रसराज भित्तीपत्रकाचे उद्घाटन

# गौरव



बारावी परीक्षेत केंद्रात सर्वप्रथम
सचिन खाडिलकरचा गौरव
करताना मा. सभापती
श्री. राजाभाऊ मिराशी



बारावी परीक्षेत
कोल्हापूर विभागात
गुणवत्ता यादीत दहावी
कु. रूपाली गोडसे हिचा
गौरव करताना
मा. सभापती



प्राचार्य डॉ. दत्ता पवार
संत राऊळ महाविद्यालय
कुडाळ यांच्या हस्ते पदवी
परीक्षेत प्रथम वर्ग प्राप्त
विद्यार्थ्यांचा गौरव



मनोगत व्यक्त करताना
विज्ञान पदवी परीक्षेत
सर्वप्रथम विमल प्रभुमिराशी.

# उपक्रम



कनिष्ठ महाविद्यालय
शैक्षणिक सहल - रत्नागिरी




जेष्ठ प्रा. उपाध्ये
क्रीडा पारितोषिक देताना



किंजवडे - श्रमदान करताना
ग्रामीण विकास विद्यार्थी



श्री. रा. ल. जोशी उपमहापौर कोल्हापूर
यांची महाविद्यालयास सदिच्छा भेट



राष्ट्रीय सेवा योजना समिती



भावपूर्ण निरोप प्रा. गोठोस्कर

# राष्ट्रीय सेवा योजना



मार्गदर्शक व प्रमुख पाहुणे
प्रा. प्रमोद गंधे, वराडकर बेलोसे
महाविद्यालय, दापोली यांचे
स्वागत



एकता दिंडी



ग्रामीण पुनर्रचना शिबीरांतर्गत
वृक्ष संवर्धन - विजयदुर्ग किल्ला



देवगड तुळशीनगर रस्ता
श्रमदानाने तयार करताना

# स्नेहसंमेलन - रोझी डे



मा. प्राचार्य
स्नेहसंमेलन कार्याध्यक्ष
प्रा. जाधव आर. जी. यांना
गुलाबपुष्प देताना



मा. प्राचार्य
स्नेहसंमेलन कार्याध्यक्षा
प्रा. वळसंगकर एल्. बी. यांना
गुलाबपुष्प देताना



बहुरंगी पोषाखातील विद्यार्थ्यांचे स्वागत.



कॉलेज क्वीन - कोरगावकर

# पारितोषिक वितरण



प्रमुख पाहुणे मा. डॉ. पद्माकर दुभाषी, कुलगुरू गोवा विद्यापीठ यांचे हार्दीक स्वागत.

पाहुण्यांचा परिचय





पारितोषिक वितरण

विद्यार्थ्यांना मौलीक मार्गदर्शन



# विविध गुणदर्शन



बाबा हो गया दिवाना।



एकांकिका - भ्रष्टाचार मुर्दाबा

उत्कृष्ट नृत्य



दुर्गेशा इचलकरंजीकर

उत्कृष्ट गायक



किशोर नाईक

उत्कृष्ट गायि



मंजुषा सहस्



स्नेहसंमेलन समिती

# फनी गेम्स



स्नेहाची यात्रा

संगीत खुर्ची





अखेर ओळख पटली

सबुरीनं ! ते पोस्टर आहे



# सांत्वन



संस्थेचे माजी उपाध्यक्ष, ज्येष्ठ समाजवादी नेते

श्री. नानासाहेब गोरे

यांना महाविद्यालयातर्फे श्रद्धांजली



मराठवाड्यातील विनाशकारी भूकंपात मृत पावलेले सर्व दुर्दैवी बांधव, मुंबई विद्यापीठाचे
माजी कुलगुरू त्र्यं. कृ. टोपे, साहित्यिक मधुकर केचे, स. गं. मालशे,
चित्रकार एस्. एम्. पंडित, ज्येष्ठ पत्रकार मूळगावकर, भारताचे पहिले लष्कर प्रमुख
जनरल करिअप्पा, क्रिकेट महर्षी प्रा. दि. ब. देवधर, उद्योगपती लालचंद हिराचंद,
नवशक्तिकार पु. रा. बेहेरे, भारतीय उद्योगाचे शिल्पकार जे. आर. डी. टाटा
तसेच सर्व ज्ञात-अज्ञात व्यक्तींना भावपूर्ण श्रद्धांजली.

# ।। मराठी विभाग ।।

*हे सारस्वताचे गोड । तुम्हीचि लाविले जी झाड ।*
*तरि अवधानामृते वाड । सिंपौनि कीजो ।*

भावार्थदीपिका

॥ [illegible] ॥

# पायगुण

"आई SS, आज मी तुझ्याच कुशीत झोपनाल हां !" श्वेताने असा बोबडा हट्ट केला खरा पण त्याने नीताचे अंतःकरण अगदी चिरून टाकले. तिने न बोलताच गहिवरल्या मनाने श्वेताच्या कुरळ्या पिंगट केसांमधून हात फिरवायला सुरुवात केली. त्या स्पर्शानं काय जादू केली काय माहीत पण श्वेता काही क्षणांतच गाढ झोपली. त्या चिमुकल्या जिवाकडे विव्हळतेनं पाहात नीता उठली. श्वेताच्या अंगावर ब्लँकेट घातलं. तिच्या कपाळावर अलगद ओठ स्पर्शून ती बाजूला झाली. खिडकीपाशी येऊन उभी राहिली. वारा थंडावलेला आणि चंद्राऐवजी आकाशात तिला श्वेताचाच चेहरा दिसत असलेला !

. . . किती आनंदी दिवस होते ते ! पुढे शिकायची इच्छाच नसल्यानं पदवीधर होताच बाबांनी माधवचं स्थळ पक्कं करून टाकलं. न सांगताही मावशीकडून मला होणारा जाच त्यांना कसा जाणे पण समजायचा. माधवचं स्थळ चांगलच होतं. मीही आढेवेढे न घेता लग्नाला तयार झाले.

माप ओलांडून ती बर्व्यांच्या घरात आली आणि माधवची कायमची सखी झाली. तिच्या आयुष्याचा नवा अध्याय सुरू झाला. एकमेकांच्या सहवासातला प्रत्येक क्षण धुंद असावा आणि तो संपूच नये असंच दोघांना वाटायचं. एकमेकांत जीव पार गुंतून गेलेले ! आपल्या मेडिकल शॉपमधून माधवही सर्वांच्या चेष्टा सहन करीत हसतहसत जरासा लवकरच परतायचा.

सहा महिन्यांनी एका सकाळी नीता अंमळ लवकरशी उठली ती 'पोटात मळमळतंय' अशी तक्रार घेऊनच ! उठली ती बेसीनकडे धावली. पाठोपाठ आलेल्या ओकारीनं एक गोड हितगूज चांदण्यासारखं घरभर उधळून दिलं. जसजसे दिवस सरत गेले तसतसं 'मुलगा की मुलगी' या विचारातली उत्सुकता ताणली जात होती. माधवला हवा होता मुलगा तर तिला मुलगी ! माधवला आपल्या वंशाचा दिवा हवा होता आणि त्याला फक्त एकच मूल हवं होतं.

पण दैवयोगानं इच्छा पूर्ण झाली नीताची ! मुलगी जन्माला आली. माधवच्या उत्साहावर विरजण पडलं, तरीदेखील तो आशावादी होता. पण दुसऱ्यांदाही पदरी मुलगीच पडली. या घटनेनंतर तर तो पूर्ण नर्व्हस झाला. पूर्वी नीताभोवती भुंग्यासम भिरभिरणारा माधव आता घरातलं तिचं अस्तित्व विसरून गेला. दुकानातून कामाच्या वाढत्या ताणाच्या सबबीखाली उशीरा येऊ लागला. संसारातला त्याचा इंटरेस्टच संपल्यासारखा झाला होता. मुलींना धडपणे कधीही त्याने जवळ घेतलेलं नव्हतं. त्याचं मन वळवण्याचा, समजूत घालण्याचा प्रयत्न अण्णा, आई आणि नीता साऱ्यांनीच करून पाहिला. पण पालथ्या घड्यावर पाणीच ! या गोष्टीचा धसका घेऊन माधवची आई अचानक साऱ्यांना मागे टाकून देवाघरी निघून गेली. माधवला पुन्हा एक मोठा धक्का बसला.

एका रात्री उशीरापर्यंत नीता त्याची वाट पहात खिडकीतच उभी होती. न जेवता अखंडपणे डोळयांच्या पणत्या पेटत्या ठेवून ! माधव आला तोच भेलकांडत, कसाबसा तोल सावरत ! माधवच्या नैराश्यानं त्याला या मार्गाला शेवटी वळवलं होतं. अण्णा आणि नीतानं त्याला सावरलं. पण दोघांचेही हात झिडकारत तो बोलला, "दूर हो ! करंटी !! घरात आल्यापासून तुझ्यामुळे बरबादी झाली. साधा मुलगा होत नाही तुला ? कपाळ करंटी ! तुझ्यामुळे माझी आई गेली ! हो. . . तुझ्यामुळेच ! पायगुणच तसा तुझा ! वाईट पायगुण. . . !

त्याचा प्रत्येक शब्द नीताच्या काळजावरती खंजिरासारखा घाव घालत होता. परिस्थितीची जाण

असणाऱ्या अण्णांनी तिला आधार दिला खरा पण मनातूनच ती कोसळली. माधव आपल्या प्रेमपाशातून मुक्त झाला आणि आपल्याला त्यानं ठोकरलं ही भावना म्हणजे कॅन्सरची मेंदूतली गाठच जणू, असं तिला वाटायला लागलं. "जन्मताच माझीही आई गेली. पण बाबा मला कधीच 'कपाळकरंटी' म्हणून बोलले नाहीत. उलट आईवेगळी पोरं म्हणून त्यांनी दुसऱ्या लग्नाची आकांक्षाही न धरता, आपल्या भावनांना मूठमाती देऊन मला वाढवलं. तसं पाहिलं तर त्यांना मी काय सुख दिलं ? काहीच नाही ! बोलायला खूप जागा असूनही ते काही बोलले नाहीत. कधीच ! कुणाचा जन्म आणि कुणाचा मृत्यू आपल्या का हातात असतो ? तो तर निसर्गाचा नियम आणि ईश्वराची इच्छा !

... माधवला हे समजत नसावं ? सांगूनही समजत नसावं. अण्णांना समजतं तर त्याला का नाही समजत ?"

अशा सैरभैर अवस्थेतच बरेच दिवस सरले. माधवची गाडी रूळावर येण्याची चिन्हे दिसेनात. नीताची किंमतही न जाणणारा माधव शरीराची भूक भागवायला मात्र न बोलावता वखवखून यायचा. त्याचा परिणाम पुन्हा एकदा व्हायचा तोच झाला. नीताला पुन्हा दिवस गेले. ज्या दिवशी हे लक्षात आलं त्याच दिवशी माधव नशेत असताना अपघातात सापडला. त्याला वाचवताना डॉक्टर्सनी बुद्धीची आणि नीतानं शुश्रूषा आणि प्रेम यांची कमाल केली. तरीही या अपघाताचं कारण त्यानं नीताचा पायगुण हेच ठरवलं. नीता पुरी कोसळली. देहाचं ओझं पेलत आला दिवस काळाच्या गर्तेत ढकलण्याचं काम करू लागली. या मानसिक खच्चीकरणात पोटातला अजून डोळेही तयार न झालेला इवलासा जीव , मुकाट, न सांगता आगंतुक जावा असा निघून गेला. नीताच्या जगण्यातला अर्थ संपला. तरीदेखील दोन वाढत्या जिवांसाठी तिला जगणंच भाग होतं. तरीदेखील भविष्याच्या अंधाराकडे नजर टाकताच अक्राळविक्राळ भुते तिला नाचताना दिसत. विचार करून करून वेड लागायची पाळी येई. कोणती दिशा पत्करावी याचाच निर्णय होत नसे.

. . . खिडकीत उभी असलेली नीता हळूच मागे वळली. अण्णांच्या कुशीत झोपलेल्या लेकीकडे तिने हळूवार आर्त नजर टाकली. सोडून जाववेना त्यांना ! माधव अजून यायचा होता. मध्यरात्र होत आलेली होती. निर्णय घेतला तर तो अंमलात आणणं कठीण असलं तरी भाग होतं. नीता हळूच दरवाजाकडे वळली. डोळ्यांतल्या गंगायमुना आणि गळ्यातल्या हुंदक्यांचा धबधबा आवरत तिनं एकदाच मागं वळून लेकरांकडं पाहिलं. आवाज न करता दरवाजा उघडला. बाहेर पडली. दरवाजा ओढून घेतला.

ती निघाली. अंधारात उजेडाची वाट शोधत ती गेली. अंधार कापत तिची मूर्ती निघाली तेव्हा अंधारालाही कसनुसं झालं. तो तिच्या सावल्या जपत तिच्यामागं जायला लागला. उजेडाकडं !!

**पुष्पलता इळकर**

द्वितीय वर्ष कला

# राष्ट्रीय सेवा योजना



मार्गदर्शक व प्रमुख पाहुणे
प्रा. प्रमोद गंधे, वराडकर बेलोसे
महाविद्यालय, दापोली यांचे
स्वागत

एकता दिंडी





ग्रामीण पुनर्रचना शिबीरांतर्गत
वृक्ष संवर्धन - विजयदुर्ग किल्ला

देवगड तुळशीनगर रस्ता
श्रमदानाने तयार करताना



# स्नेहसंमेलन - रोझी डे



मा. प्राचार्य
स्नेहसंमेलन कार्याध्यक्ष
प्रा. जाधव आर. जी. यांना
गुलाबपुष्प देताना

मा. प्राचार्य
स्नेहसंमेलन कार्याध्यक्षा
प्रा. वळसंगकर एल्. बी. यांना
गुलाबपुष्प देताना





बहुरंगी पोषाखातील विद्यार्थ्यांचे स्वागत.

कॉलेज क्वीन - कोरगावकर



# पारितोषिक वितरण



प्रमुख पाहुणे मा. डॉ. पद्माकर दुभाषी, कुलगुरू गोवा विद्यापीठ यांचे हार्दीक स्वागत.



पाहुण्यांचा परिचय




पारितोषिक वितरण




विद्यार्थ्यांना मौलीक मार्गदर्शन

# विविध गुणदर्शन



बाबा हो गया दिवाना।



एकांकिका - भ्रष्टाचार मुर्दाबाद

**उत्कृष्ट नृत्य**




दुर्गेशा इचलकरंजीकर

**उत्कृष्ट गायक**



किशोर नाईक

**उत्कृष्ट गायिका**



मंजुषा सहस्त्रबुद्धे



स्नेहसंमेलन समिती

# फनी गेम्स



स्नेहाची यात्रा

संगीत खुर्ची





अखेर ओळख पटली

सबुरीनं ! ते पोस्टर आहे



# सांत्वन



संस्थेचे माजी उपाध्यक्ष, ज्येष्ठ समाजवादी नेते
श्री. नानासाहेब गोरे
यांना महाविद्यालयातर्फे श्रद्धांजली



मराठवाड्यातील विनाशकारी भूकंपात मृत पावलेले सर्व दुर्दैवी बांधव, मुंबई विद्यापीठाचे
माजी कुलगुरू त्र्यं. कृ. टोपे, साहित्यिक मधुकर केचे, स. गं. मालशे,
चित्रकार एस्. एम्. पंडित, ज्येष्ठ पत्रकार मूळगावकर, भारताचे पहिले लष्कर प्रमुख
जनरल करिअप्पा, क्रिकेट महर्षी प्रा. दि. ब. देवधर, उद्योगपती लालचंद हिराचंद,
नवशक्तिकार पु. रा. बेहेरे, भारतीय उद्योगाचे शिल्पकार जे. आर. डी. टाटा
तसेच सर्व ज्ञात-अज्ञात व्यक्तींना भावपूर्ण श्रद्धांजली.

# ।। मराठी विभाग ।।

*हे सारस्वताचे गोड । तुम्हीचि लाविले जी झाड ।*
*तरि अवधानामृते वाड । सिंपौनि कीजो ।*

*भावार्थदीपिका*

# पायगुण

"आई SS, आज मी तुझ्याच कुशीत झोपनाल हां !" श्वेताने असा बोबडा हट्ट केला खरा पण त्याने नीताचे अंतःकरण अगदी चिरून टाकले. तिने न बोलताच गहिवरल्या मनाने श्वेताच्या कुरळया पिंगट केसांमधून हात फिरवायला सुरुवात केली. त्या स्पर्शानं काय जादू केली काय माहीत पण श्वेता काही क्षणांतच गाढ झोपली. त्या चिमुकल्या जिवाकडे विव्हळतेनं पाहात नीता उठली. श्वेताच्या अंगावर ब्लँकेट घातलं. तिच्या कपाळावर अलगद ओठ स्पर्शून ती बाजूला झाली. खिडकीपाशी येऊन उभी राहिली. वारा थंडावलेला आणि चंद्राऐवजी आकाशात तिला श्वेताचाच चेहरा दिसत असलेला !

. . . किती आनंदी दिवस होते ते ! पुढे शिकायची इच्छाच नसल्यानं पदवीधर होताच बाबांनी माधवचं स्थळ पक्कं करून टाकलं. न सांगताही मावशीकडून मला होणारा जाच त्यांना कसा जाणे पण समजायचा. माधवचं स्थळ चांगलच होतं. मीही आढेवेढे न घेता लग्नाला तयार झाले.

माप ओलांडून ती बर्व्यांच्या घरात आली आणि माधवची कायमची सखी झाली. तिच्या आयुष्याचा नवा अध्याय सुरू झाला. एकमेकांच्या सहवासातला प्रत्येक क्षण धुंद असावा आणि तो संपूच नये असंच दोघांना वाटायचं. एकमेकांत जीव पार गुंतून गेलेले ! आपल्या मेडिकल शॉपमधून माधवही सर्वांच्या चेष्टा सहन करीत हसतहसत जरासा लवकरच परतायचा.

सहा महिन्यांनी एका सकाळी नीता अंमळ लवकरशी उठली ती 'पोटात मळमळतंय' अशी तक्रार घेऊनच ! उठली ती बेसीनकडे धावली. पाठोपाठ आलेल्या ओकारीनं एक गोड हितगूज चांदण्यासारखं घरभर उधळून दिलं. जसजसे दिवस सरत गेले तसतसं 'मुलगा की मुलगी' या विचारातली उत्सुकता ताणली जात होती. माधवला हवा होता मुलगा तर तिला मुलगी ! माधवला आपल्या वंशाचा दिवा हवा होता आणि त्याला फक्त एकच मूल हवं होतं.

पण दैवयोगानं इच्छा पूर्ण झाली नीताची ! मुलगी जन्माला आली. माधवच्या उत्साहावर विरजण पडलं, तरीदेखील तो आशावादी होता. पण दुसऱ्यांदाही पदरी मुलगीच पडली. या घटनेनंतर तर तो पूर्ण नर्व्हस झाला. पूर्वी नीताभोवती भुंग्यासम भिरभिरणारा माधव आता घरातलं तिचं अस्तित्व विसरून गेला. दुकानातून कामाच्या वाढत्या ताणाच्या सबबीखाली उशीरा येऊ लागला. संसारातला त्याचा इंटरेस्टच संपल्यासारखा झाला होता. मुलींना धडपणे कधीही त्याने जवळ घेतलेलं नव्हतं. त्याचं मन वळवण्याचा, समजूत घालण्याचा प्रयत्न अण्णा, आई आणि नीता साऱ्यांनीच करून पाहिला. पण पालथ्या घड्यावर पाणीच ! या गोष्टीचा धसका घेऊन माधवची आई अचानक साऱ्यांना मागे टाकून देवाघरी निघून गेली. माधवला पुन्हा एक मोठा धक्का बसला.

एका रात्री उशीरापर्यंत नीता त्याची वाट पहात खिडकीतच उभी होती. न जेवता अखंडपणे डोळयांच्या पणत्या पेटत्या ठेवून ! माधव आला तोच भेलकांडत, कसाबसा तोल सावरत ! माधवच्या नैराश्यानं त्याला या मार्गाला शेवटी वळवलं होतं. अण्णा आणि नीतानं त्याला सावरलं. पण दोघांचेही हात झिडकारत तो बोलला, "दूर हो ! करंटी !! घरात आल्यापासून तुझ्यामुळे बरबादी झाली. साधा मुलगा होत नाही तुला ? कपाळ करंटी ! तुझ्यामुळे माझी आई गेली ! हो. . . तुझ्यामुळेच ! पायगुणच तसा तुझा ! वाईट पायगुण. . . !

त्याचा प्रत्येक शब्द नीताच्या काळजावरती खंजिरासारखा घाव घालत होता. परिस्थितीची जाण

असणाऱ्या अण्णांनी तिला आधार दिला खरा पण मनातूनच ती कोसळली. माधव आपल्या प्रेमपाशातून मुक्त झाला आणि आपल्याला त्यानं ठोकरलं ही भावना म्हणजे कॅन्सरची मेंदूतली गाठच जणू, असं तिला वाटायला लागलं. "जन्मताच माझीही आई गेली. पण बाबा मला कधीच 'कपाळकरंटी' म्हणून बोलले नाहीत. उलट आईवेगळी पोरं म्हणून त्यांनी दुसऱ्या लग्नाची आकांक्षाही न धरता, आपल्या भावनांना मूठमाती देऊन मला वाढवलं. तसं पाहिलं तर त्यांना मी काय सुख दिलं ? काहीच नाही ! बोलायला खूप जागा असूनही ते काही बोलले नाहीत. कधीच ! कुणाचा जन्म आणि कुणाचा मृत्यू आपल्या का हातात असतो ? तो तर निसर्गाचा नियम आणि ईश्वराची इच्छा !

... माधवला हे समजत नसावं ? सांगूनही समजत नसावं. अण्णांना समजतं तर त्याला का नाही समजत ?"

अशा सैरभैर अवस्थेतच बरेच दिवस सरले. माधवची गाडी रूळावर येण्याची चिन्हे दिसेनात. नीताची किंमतही न जाणणारा माधव शरीराची भूक भागवायला मात्र न बोलावता वखवखून यायचा. त्याचा परिणाम पुन्हा एकदा व्हायचा तोच झाला. नीताला पुन्हा दिवस गेले. ज्या दिवशी हे लक्षात आलं त्याच दिवशी माधव नशेत असताना अपघातात सापडला. त्याला वाचवताना डॉक्टर्सनी बुद्धीची आणि नीतानं शुश्रूषा आणि प्रेम यांची कमाल केली. तरीही या अपघाताचं कारण त्यानं नीताचा पायगुण हेच ठरवलं. नीता पुरी कोसळली. देहाचं ओझं पेलत आला दिवस काळाच्या गर्तेत ढकलण्याचं काम करू लागली. या मानसिक खच्चीकरणात पोटातला अजून डोळेही तयार न झालेला इवलासा जीव , मुकाट, न सांगता आगंतुक जावा असा निघून गेला. नीताच्या जगण्यातला अर्थ संपला. तरीदेखील दोन वाढत्या जिवांसाठी तिला जगणंच भाग होतं. तरीदेखील भविष्याच्या अंधाराकडे नजर टाकताच अक्राळविक्राळ भुते तिला नाचताना दिसत. विचार करून करून वेड लागायची पाळी येई. कोणती दिशा पत्करावी याचाच निर्णय होत नसे.

. . . खिडकीत उभी असलेली नीता हळूच मागे वळली. अण्णांच्या कुशीत झोपलेल्या लेकीकडे तिने हळूवार आर्त नजर टाकली. सोडून जाववेना त्यांना ! माधव अजून यायचा होता. मध्यरात्र होत आलेली होती. निर्णय घेतला तर तो अंमलात आणणं कठीण असलं तरी भाग होतं. नीता हळूच दरवाजाकडे वळली. डोळयांतल्या गंगायमुना आणि गळयातल्या हुंदक्यांचा धबधबा आवरत तिनं एकदाच मागं वळून लेकरांकडं पाहिलं. आवाज न करता दरवाजा उघडला. बाहेर पडली. दरवाजा ओढून घेतला.

ती निघाली. अंधारात उजेडाची वाट शोधत ती गेली. अंधार कापत तिची मूर्ती निघाली तेव्हा अंधारालाही कसनुसं झालं. तो तिच्या सावल्या जपत तिच्यामागं जायला लागला. उजेडाकडं !!

**पुष्पलता इळकर**

द्वितीय वर्ष कला

# विकसनशील भारताचे प्रणेते जे. आर. डी. टाटा

भारतात आधुनिक औद्योगिक साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी ज्यांनी आपली विधायक कर्तृत्वशक्ती उपयोगी आणली, अशा काही व्यक्तींमध्ये जे. आर. डी. टाटा यांचे स्थान ध्रुवपदावर मानावे लागेल. जे. आर. डींचे व्यक्तीमत्व म्हणजे कला, कर्तृत्व व जिद्द यांचा सुंदर मिलाफ होता. अशा या उत्तुंग व्यक्तिमत्वाला आता आपण पारखे झालो आहोत.

गेल्या शतकात भारतातच कारखानदारीची वाढ करून, विलायतेत चाललेला भारतीय संपत्तीचा ओघ थांबविण्याच्या हेतूने जे काही राजकारणी व व्यापारी लोक पुढे आले त्यांच्यात जमशेटजी टाटा यांचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल.

१८६० मध्ये मँचेस्टरमध्ये ऐकलेल्या कार्लाईलच्या भाषणाने प्रभावीत होऊन जमशेटजींनी भारतात बिहारमध्ये पोलाद कारखाना उभारण्याचे ठरविले व कारखाना उभारणीच्याकामी त्यांनी जे. आर. डींचे वडील रतनजी टाटा यांची नेमणूक केली. या कामापायी रतनजींच्या अनेक परदेश वाऱ्या होत. यातूनच त्यांची सुझान ब्रेअरी या फ्रेंच युवतीशी ओळख झाली व त्यांनी तिच्याशी विवाह केला. जहाँगिर वा जे. आर. डी. हे या दांपत्याचे एक अपत्य होय.

जे. आर. डी. टाटा यांचा जन्म पॅरीस येथे १९०४ साली झाला. त्यांचे बालपण पॅरीस येथेच गेले. त्यांची मातृभाषा फ्रेंच होती. वडिलांच्या सततच्या फिरतीमुळे त्यांच्या शालेय शिक्षणाची आबाळच झाली. जे. आर. डींच्या पंधराव्या वर्षी त्यांचे वडील मुंबई येथे स्थायिक झाले. मुंबई येथेच जे. आर. डी. इंग्रजी व गुजराथी बोलण्यात पारंगत झाले व व्यावहारिक शिक्षणही त्यांनी थोड्याच अवधीत मिळविले.

वयाच्या अठराव्या वर्षीपासून जे. आर. डींच्या जीवनात नवीन अध्याय सुरू झाला. सन १९२२ मध्ये म्हणजेच वयाच्या अठराव्या वर्षी जे. आर. डी. टाटा कंपनीत दाखल झाले. जॉन पीटरसन् या स्कॉटिश माणसाच्या हाताखाली मदतनीस म्हणून ते काम पाहू लागले व चार-पाच वर्षे अहोरात्र मेहनत करून पोलादाच्या उत्पादनाचे व कंपनीच्या व्यवस्थापनाचे शिक्षण त्यांनी घेतले. पण १९२५ साली पित्याच्या सावलीचे प्रेमळ छत्र हरपले. याच साली जे. आर. डी. टाटा कंपनीचे डायरेक्टर झाले.

यानंतरचा चार-पाच वर्षांचा काळ जे. आर. डींच्या कसोटीचा ठरला. १९२९ साली जगभर मंदीची लाट पसरली होती. अमेरिकेसारख्या संपन्न राष्ट्रालादेखील या लाटेचा तडाखा बसला तसाच भारतातील कंपन्यांना बसला. टाटा कंपनीलाही बरेच नुकसान सोसावे लागले. पण जमशेटजींची मुले सर रतन व सर दोराब ही खंबीर होती. यावेळी जे. आर. डींना अनेक संकटातून जावे लागले. पण जे. आर. डी. डगमगले नाहीत. टाटा बंधुंनी जे. आर. डींची यावेळी बारकाईने परीक्षा केली व आपल्यामागे हा मुलगा आपल्या कंपनीची धुरा समर्थपणे सांभाळील अशी त्यांची खात्री पटली.

पुढे १९३५ साली सर दोराबजी वारले व सर नोरोजी सकलातवाला अध्यक्ष झाले व जे. आर. डी. डेप्युटी झाले. पुढे सकलातवालानंतर १९३८ साली वयाच्या अवघ्या चौतिसाव्या वर्षी जे. आर. डी. टाटा औद्योगिक समूहाचे अध्यक्ष झाले.

जे. आर. डींच्या नेतृत्वाखाली टाटा समूहाचा विस्तार चहूबाजूने झाला. प्रत्येक क्षेत्र त्यांनी पादाक्रांत केले. टाटा स्टील अँड आयर्न, टेल्को यासारख्या कंपन्या

त्यांनी उभारल्या. कापड, रसायने, औषधे, इंजिनिअरींग, कॉम्प्युटर्स, हॉटेल्स, इलेक्ट्रॉनिक्स अशी अनेक प्रकारची उत्पादने त्यांनी सुरू केली.

वीज, पोलाद, विज्ञान या क्षेत्रातच नव्हे तर टाटांच्या असामान्य कर्तृत्वाने आसमानही गाठले. १९३० साली जे. आर. डींनी इंग्लंडमधून भारतापर्यंत प्रथम विमानोड्डाण केले. या विलक्षण साहसी प्रेमातूनच त्यांनी कराची ते मुंबई ही पहिली हवाई टपालसेवा सुरु केली व नंतर या वाहतुकीचे राष्ट्रीयीकरण होताच 'एअर इंडिया' ची धुरा वाहून आपल्या असामान्य बुद्धीमत्तेने ही कारकीर्द सफल केली.

टाटांनी राष्ट्रउभारणीच्या कामात व भारताला स्वातंत्र्यप्राप्तीसाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे सढळ मदत केली. राष्ट्रउभारणीच्या कामात त्यांनी अनेक मोठे विश्वस्त निधी उभारले. इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च, नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्टस्, टाटा कॅन्सर रिसर्च इन्स्टिट्यूट अशा अनेक समाजोपयोगी संस्थांचे संगोपन व संवर्धन टाटांच्याच नेतृत्वाखाली झाले.

स्वातंत्र्यप्राप्तीसाठी त्यांनी सतत द्रव्य-सहाय्य केले. १९४२ च्या गवालिया मैदानावरील संस्मरणीय सभेत ते निर्भयपणे उपस्थित होते. तर दांडीयात्रेत जेव्हा महात्माजी साबरमतीहून नवसारीला आले तेव्हा त्यांची व्यवस्था जे. आर. डींच्या घरीच होती. १९४२ साली जेव्हा टाटांच्या कंपनीचे कामगार स्वातंत्र्य चळवळीला पाठिंबा देण्यासाठी संपावर गेले तेव्हा टाटा हे पहिलेच मालक असतील की कामगारांच्या संपाला त्यांनी पूर्ण पाठिंबा दिला.

कामगारांच्या दृष्टीने जे. आर. डींच्या अध्यक्षपदाच्या काळात त्यांच्या कंपनीत मालकाविरुद्ध कामगारांनी एकदाही संप केला नाही. त्यांच्यातील अभिजात माणुसकीमुळे त्यांनी कामगारांवर अपत्यवत प्रेम केले. ते प्रसिद्धी पराङ्मुख होते. त्यांचे मन हळूवार होते. इतरांमध्ये मिसळताना त्यांची श्रीमंती कधीही त्यांच्या आड आली नाही. त्यांची गुणग्राहकता वाखाणण्याजोगी होती. जे. आर. डी. म्हणजे 'सकल गुणांचे आगारू' होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा उद्यमशील, विज्ञाननिष्ठ भारत घडविण्यात जे. आर. डींचा सिंहाचा वाटा होता हे आपण विसरू शकणार नाही. आजकाल खऱ्या अर्थाने मोठा माणूस मिळणे दुरापास्त आहे. पण हा मोठा माणूस आपल्यात होता हा विचारही आपणास दिलासादायक वाटतो. त्यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन करताना एवढेच म्हणावेसे वाटते की,

*" मी पण त्यांचे पक्व फळापरी*
*सहजपणाने गळले हो*
*जीवन त्यांना कळले हो !"*

**शिल्पा सोमण**

प्रथम वर्ष विज्ञान

# संगत

तसे पाहिले तर खेडेच होते ते. थोड्याफार सुधारणा झाल्या होत्या तरी मूळचा खेडेपणा होताच. श्रीकांतचे एकच कुटुंब गावात असे होते की, कष्ट करून प्रामाणिकपणे जीवन जगत होते. श्रीकांत दोन मुले आणि पत्नीसह मजेत होता. एकटाच कमावर जाई व येई. ना कसले व्यसन, ना कुणाची सोबत. आहे त्यात सुखात राहायचे एवढेच श्रीकांतला माहीत. घरात असेल ते सुखाने खायचे ही त्याच्या बायकोची वृत्ती. दुसऱ्याकडे हात पसरायची वेळ कधी आलीच नाही. गावातल्या लोकांशी संबंध नव्हते असे नाही. पण होते तेही जातायेता हाक मारण्यापुरतेच.

त्या दिवशी श्रीकांत जरा जास्तच खुशीत होता. पगारवाढ मिळाली होती ही एक गोष्ट आणि त्यामुळेच मुलांसाठी खेळणी घेऊन त्यांचा बऱ्याच दिवसांपासूनचा हट्टही पुरवता येणार होता. आपल्याच नादात श्रीकांत झपाझप पावले टाकत होता. तोच कानावर हाक आली. कोण हाक मारणार आपल्याला म्हणून वळून पाहतो तर भराभर पावले टाकत अमरने त्याला गाठलेच.

"कोण, अमर ?" श्रीकांत म्हणाला, "इतके दिवस रोज आपण भेटतो तरी कधी हाक मारली नाहीस आणि आज अचानक हाक मारतोस ? काही काम होतं का ?"

"तसं नाही रे, एकटाच चालला होतास म्हणून म्हटले हाक मारुया. जाऊ संगतीने घरी."

श्रीकांत आणि अमर संथ चालीनं गप्पा मारत निघाले. गप्पांच्या ओघात मुलांना खेळणी घ्यायची श्रीकांत कधीच विसरून गेला. आपलं काम, सर्वांची आपल्याशी प्रेमळ वागणूक, कुटुंब या सर्वांविषयी तो भरभरून सांगत राहिला. थोड्या वेळाने त्याला जाणवले की, आपण एकटेच बराचवेळ बोलत आहोत. अमर काहीच बोलत नाही.

"काय रे, गप्प का झालास ? माझे बोलणे तुला आवडले नाही का ?" श्रीकांतने विचारले.

"नाही". अमर म्हणाला, "विचार करत होतो की असं भाग्य मिळायला तू काय केलं असशील ! नाहीतर माझं बघ, एकुलता एक म्हणून लाडात वाढलो. माझा प्रत्येक हट्ट आई-वडीलांनी प्रेमाने पुरवला. हुशार होतो त्यामुळे शिक्षणात कुठेही मागे पडलो नाही. शिक्षण पूर्ण होताच मोठ्या पगाराची नोकरीही मिळाली. वडीलोपार्जित चालून आलेली इस्टेट, मोठ्या पगाराची नोकरी, त्यामुळे सुखात राहायचं एवढंच काय ते बाकी होतं. पण सुखाला गालबोट लागलं ते माझ्या विवाहानं. अनीताशी लग्न झालं आणि जणू आमचं घर दुभंगलं. आजी, आजोबा, आई-वडील, चार चुलते, सर्वांची मुले मिळून जवळजवळ पंचवीस माणसांचं आमचं भलमोठं कुटुंब होतं. शिवाय चार-पाच नोकर कायमच घरात असायचे. एका काकांची फॅक्टरी, एक राजकारणातले, एक सदैव समाजकार्यात मग्न, आणि एकाचे आध्यात्म. त्यामुळे घर नुसते येणाजाणाऱ्यांनी गजबजून गेलेले. सगळ्यांची मुले, सुना, नातवंडे कशी खेळीमेळीने राहात होती. अनीता आली ती सुरुंग लावतच. वाटण्या झाल्या. सर्वजण विभक्त झाले. जो तो आपलं पाहू लागला. आणि हीचं लक्ष संसारात नाहीच. मित्रमैत्रीणी, पार्ट्या, सहली, खरेदी. घराचा नुसता क्लब झाला. हळूहळू खटके उडू लागले. शेवटचा पर्याय घटस्फोटाचा. मग काय मी आणि घराच्या भकास भींती. कारण ह्या सगळ्या प्रकरणात आई-वडीलांनी थोड्याच दिवसांत जगाचा निरोप घेतला. आजी-आजोबा काकांकडे असतात. मला बघीतलं तरी त्यांना भडभडून येतं. तू सगळं सांगतोस आणि माझ्या डोळ्यांसमोर मात्र

निराशेचा नुसताच काळा पडदा आहे".

"मग आता एकटा कसा राहतोस ? दुसरं लग्न करायचं नाही का ?" श्रीकांतने त्याचे दुःख कमी करण्याचा प्रयत्न केला. "दुसरं लग्न ? नाव काढू नकोस. एकाच लग्नाने माझी ही अवस्था झाली. पुन्हा दुसरं लग्न करून काय होईल ते पाहाण्याची ताकदच नाही बघ माझ्यात". अमर खचून गेला होता.

'अरे, सर्वच स्त्रीया काही सारख्या नसतात. तुला जपणारी, तुझ्या दुःखावर फुंकर घालून मायेने सांभाळणारी नक्कीच तुला मिळू शकेल. आयुष्यात कुणाची तरी साथसंगत असावीच लागते. एकट्याने राहाणे किती दिवस जमणार ?" श्रीकांत समजूत घालत म्हणाला.

"संगत मला आता चांगली मिळाली आहे." अमरचे बोलणे ऐकून श्रीकांतला बरे वाटले. याच्या भकास आयुष्यात थोडीतरी हिरवळ यावी असे त्याला मघापासून वाटत होते. पुढे काय सांगतो हे ऐकण्याची त्याला उत्सुकता होती तोच अमर म्हणाला, "चल माझ्याबरोबर. तुला दाखवतो मला कोणाची संगत मिळाली आहे ते".

थोडे चालून गेल्यावर दोघेही एका अलीशान इमारतीजवळ पोहोचले. अमरकडे श्रीकांतने पाहिले तेव्हा अमरने त्याचा हात हातात धरला. दोघेही पायऱ्या चढून आत गेले. आतला मंद नीळसर उजेड आणि संगीत कनांवर पडताच श्रीकांतने ओळखले आपण कुठे आलो आहोत ते. अमरने एका टेबलाजवळ त्याला नेले. दोघेही स्थानापन्न होताच वेटर आला. नेहमीप्रमाणे अमरने त्याला काहीतरी सांगितले. थोड्यावेळाने तो ट्रेमध्ये बाटली, ग्लास असे साहित्य घेऊन आला आणि टेबलावर मांडून निघून गेला. श्रीकांतची उत्सुकता पार मावळली होती. श्रीकांतकडे पाहात ग्लास व बाटली जवळ घेत अमर म्हणाला,

"गेले कित्येक दिवस हीच माझी संगत आहे बघ. ना कसला त्रास, ना कसली कटकट. काही मागत नाही, भांडत नाही, की घटस्फोट घ्यायचा प्रश्नही उद्भवत नाही. जगातल्या कुठल्याच स्त्रीवर माझा विश्वास बसणार नाही. मन एवढं दुभंगून गेलं आहे की, आता ते कुणीतरी येऊन कसंतरी जोडून द्यावं आणि पुन्हा तुटू नये म्हणून आयुष्यभर जोड सांभाळीत राहावं हे कसं शक्य आहे तूच सांग ?"

अमरने नेहमीच्या सरावाप्रमाणे आपला कार्यक्रम सुरू केला. ग्लास रिचवला जात होता आणि दुःख ओकलं जात होतं. श्रीकांतने ओळखलं की, याच्या मनावर फार मोठा आघात झाला आहे. याला नुसतं सांगून भागणार नाही. याच्यासाठी नक्कीच काहीतरी करण्याची गरज आहे. श्रीकांतवर आता त्याला व्यवस्थित घरी पोहोचवण्याची जबाबदारी होती. अमरला सांभाळत त्याने टॅक्सी केली आणि त्याच्या घरी पोहोचविले. नोकराला सांगितले की, उद्या सुटी आहे. मी सकाळी येईल, असा उठल्यावर त्याला निरोप दे. श्रीकांत एवढे सांगून आपल्या घराकडे निघाला. पगारवाढ, खेळण्याची आठवण झाली पण खरेदी करण्याची इच्छाच मावळली होती.

घरी आल्यावर मुले जवळ आली. त्यांचा अभ्यास, दिवसभरातल्या गंमती त्यानं ऐकल्या. मुले खेळायला गेली तसा श्रीकांतने बायकोजवळ अमरचा विषय काढला. सर्व ऐकल्यावर तिलाही वाईट वाटले. दुसऱ्या दिवशी अमरकडे जाण्याचे ठरवून टाकले.

श्रीकांत आपल्या बायकोला व मुलांना घेऊन सकाळीच अमरकडे आला होता. सुरुवातीला मित्राच्या बायकोला बघून अमर थोडा ओशाळला होता. पण नंतर गप्पांगोष्टींत रमून गेला. श्रीकांतच्या मुलांनी अमरकाकांचा ताबा घेतला. नकला, गाणी, गोष्टी सांगून त्यांनी अमरचे मन आनंदी केले. संध्याकाळी सर्वजण फिरायला बाहेर पडली तेव्हा अमरच्या मनात येऊ लागले, "खरंच आपल्यालाही अशी मुलं असती तर ?"

दिवसभराच्या गप्पा, खेळीमेळीचे वातावरण यात संध्याकाळी अमरला उदास वाटलेच नाही. काळोख

होताना सर्वजण परत फिरले. अमरला घरी सोडून पुढे जायचे श्रीकांतने ठरवले होते. दारात निरोप घेताना अमर म्हणाला,

"वहिनी, आता पुन्हा केव्हा येणार ? आज तुमच्या सानिध्यात दिवस खूप छान गेला. कितीतरी दिवसांनी मुलांच्या आवाजाने घर गजबजून गेलं."

"जरूर येऊ. आमच्या येण्याने तुम्हाला आनंद होणार असेल तर का नाही येणार?" श्रीकांतची पत्नी म्हणाली आणि मुलांनी उद्या कुठे जायचे ते अमरकाकाला लगेच सांगून टाकले.

दररोज अमर आणि श्रीकांतची भेट होऊ लागली आणि हळूहळू श्रीकांत, त्याची पत्नी, मुले यांच्या सानिध्यात अमर बदलू लागला. त्याच्यातला फरक बघून श्रीकांतला समाधान वाटत होते. आपल्या मित्राची वाईट अवस्था बदलण्यात आपण यशस्वी झालो याचा आनंद वाटत होता.

एक दिवस खेळता-खेळता आत येऊन श्रीकांतची मुलगी म्हणाली, "काका, तुमच्या घरी काकू कशा नाहीत ? काकू कुठे गेल्या ? केव्हा आणणार आहात ?"

अमरने श्रीकांतकडे पाहिले. श्रीकांतच्याही डोळयांत तोच प्रश्न होता. छोट्या राणीच्या पाठीवर थोपटत अमर म्हणाला, "लवकरच मिळेल हं तुला काकूची संगत."

**मंगल हिंदळेकर**

बारावी कला

# डंकेल प्रस्ताव व भारतीय कृषी क्षेत्र

गॅट (जनरल ॲग्रीमेंट ऑन ट्रेड टॅरिफ) चे महासंचालक यांनी मांडलेल्या 'डंकेल प्रस्तावा'ने साऱ्या जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. या डंकेल प्रस्तावाचा प्रामुख्याने भारतीय कृषीक्षेत्रावर काय परिणाम होणार आहे, याचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न इथे केलेला आहे. या प्रस्तावावर अनेक राजकीय पक्ष, सेवाभावी संस्था, नामवंत तज्ज्ञ यांनी विविध प्रकारे मतप्रदर्शन केले आहे. पण बहुतांशी सूर हा प्रस्तावाच्या विरोधातच आहे.

## डंकेल प्रस्ताव व भारतीय शेती

या प्रस्तावामुळे भारतीय शेतीवर कोणते दूरगामी परिणाम होतील यांची थोडक्यात चर्चा करू.

**(१) सबसिडी -**

शेतीला दिल्या जाणाऱ्या सबसिडीत सुरुवातीला ३० टक्के ते ३५ टक्के कपात करावी असे या प्रस्तावात म्हटले आहे. त्यानंतर पुढील सहा वर्षांच्या कालावधीत आणखी ३५ टक्के कपात करून साधारणतः इसवी सन २००३ पर्यंत सर्व सबसिडी संपूर्णपणे बंद करावी असे सुचवले गेले आहे. पण यामुळे खते व कीटकनाशके, अन्य औषधे यांच्या किंमती भरमसाट वाढतील. सर्वसामान्य शेतकऱ्याला ती न परवडून त्याचे पर्यवसान प्रति हेक्टरी निघणारे उत्पादन कमी होण्यात होईल. त्यामुळे धान्यटंचाई निर्माण होऊ शकते.

**(२) शेती संशोधन बंदी -**

सदर प्रस्तावानुसार वस्तूचे पेटंटीकरण करण्याची तरतूद आहे. त्यानुसार आपल्या देशातील प्रायोगिक स्वरूपातील बियाणे परदेशी नेऊन संस्कारित केल्यावर त्याचे प्रॉडक्ट-पेटंट घेतलं जाईल. हे पेटंट वीस वर्षे संरक्षित राहील. त्यामुळे त्यावर मक्तेदारी स्थापन झाल्याने ते विकतील त्या किंमतीला आपणास खरेदी करावे लागेल. याचा परिणाम सर्वप्रकारे महागाई भरमसाट वाढण्यात होईल. तसेच शेतीवर अनिष्ट परिणाम होतील. याचा फटका मजूर, भूमीहीन शेतकरी यांना आणि सर्वसामान्य ग्राहकाला बसेल आणि हा वर्ग मोठ्या प्रमाणावर महागाईमध्ये भरडून निघेल.

**(३) पीक आकृतीबंध -**

आपल्या पीक आकृतीबंधाचा आपण विचार केल्यास असे दिसते की इतर देशांत आपण फळे, बासमती तांदूळ, कापूस अशी नगदी पिकेच फक्त निर्यात करतो. ज्वारी, बाजरी वा तत्सम पिके नव्हे. उद्या या प्रस्तावामुळे वरील सर्व नगदी पिकांच्या किंमती वाढल्यास सर्व शेतकरी याच पिकांचे उत्पादन वाढवतील. त्यामुळे अन्नधान्याकडे दुर्लक्ष होऊन त्याचे उत्पादन कमी होईल व ज्वारी, बाजरी वा अन्य दैनंदिन गरजेच्या धान्यांच्या देशांतर्गत किंमती खूप वाढतील. आपल्या देशात आजही सुमारे ४० टक्के जनता ही दारिद्र्यरेषेखाली जगत आहे. हा वर्ग, तसेच मध्यमवर्गीय सामान्य ग्राहक या ओझ्याखाली दोन सुखाचे घास घेऊ शकणार नाही.

**(४) शेतमजूर वेतनवाढ -**

शेतीमालाच्या किंमती वाढल्यामुळे काही प्रमाणात शेतमजुरांचे वेतन वाढेलही. पण अद्यापि हे क्षेत्र असंघटीत असल्याने या वाढीबद्दल शंकाच आहे. पण समजा ते वाढले तर औद्योगिक क्षेत्रातील कामगारही आपले वेतन वाढवून घेतील, कारण ते सुसंघटीत आहेत. या गोष्टीमुळे औद्योगिक बाजारपेठेतही संबंधीत उत्पादनाच्या किंमती वाढतील. त्यामुळे निर्यात घटेल. त्याचवेळी आपण अन्नधान्य व इतर गोष्टी आयात करीत असू. त्यामुळे आयात-निर्यात यांतील समतोल बिघडून परकीय गंगाजळीचा प्रश्न निर्माण होईल. त्यामुळे पुनश्च अन्नधान्य टंचाई निर्माण होईल. हे

दुष्टचक्र चालूच राहील

सध्या भारतीय अर्थव्यवस्थेचा विचार करता प्रचंड प्रमाणात चालू असलेला भ्रष्टाचार, राजकीय उलाढाली, काळा बाजार यांनी ती खिळखिळी केली आहे. त्यामुळेच डंकेल प्रस्ताव हा राजकीय व सामाजिक अशा दोन्ही दृष्टिकोनांतून आपल्यासमोर एक आव्हान आहे. हा प्रस्ताव ठोकरून लावणे अत्यावश्यक आहे. फक्त शेतकऱ्यांचा प्रश्न म्हणून याकडे न बघता शेतकरी, मजूर, वैज्ञानिक औद्योगिक क्षेत्र या सर्वांचाच प्रश्न म्हणून पाहिले पाहिजे. देशाच्या सार्वभौमत्त्वाचा हा प्रश्न आहे. त्यासाठी वरील व तत्सम सर्व सामाजिक स्तरांनी पूर्वग्रह विसरून एकात्म होणे व आंदोलन उभारणे आवश्यक आहे. देशाचे हितसंबंध सांभाळून पक्षीय राजकारणाच्या घाणीतून बाहेर पडून नेत्यांनी ही आर्थिक परचक्राची लढाई लढायला हवी.

तरच स्वातंत्र्याची दुसरी लढाई जिंकली जाईल आणि स्वातंत्र्याचा खरा अर्थ इथल्या मातीत रुजेल.

**विश्वामित्र खडपकर**

तृतीय वर्ष कला



# ओळख - वैदिक गणिताची

'वैदिक गणित' ही एक मोठी रसपूर्ण आणि मनोरंजक गणित पद्धती आहे. तो अभ्यास मोठा आहे आणि एका लेखामध्ये त्याची संपूर्ण माहिती होणे कठीणच! तरीही निदान वैदिक गणिताची ओळख व्हावी, एवढा हेतू या लेखामुळे निश्चीतच फलद्रुप होईल.

प्रथम गुणाकाराची वैदिक गणितामधील रीत पाहू.

**। निखिलं नवतः चरमं दशतः ।**

याचाच अर्थ 'नऊमधून सर्व आणि दहामधून शेवटचं !' यावरून काहीच बोध होत नाही. त्यासाठी आपण एक छोटं उदाहरण घेऊ -

समजा, आपणास ९ X ८ हा गुणाकार करावयाचा आहे. या ठिकाणी गुण्य आहेत नऊ व गुणक आहेत आठ या संख्या ! या दोन्हींना जवळ असणारी घातांक संख्या आपण 'पाया' म्हणून घ्यायची. या दोन्ही संख्यांना जवळची घातांकसंख्या आहे दहा आणि म्हणूनच हीच संख्या आपण पाया म्हणून गृहित धरायची.

या 'पाया' मधून गुण्य व गुणक वजा करायचे. गुण्य व गुणक संख्येपुढे विसर्गचिन्हे लिहून अनुक्रमे येणारी वजाबाकी त्यापुढे लिहायची म्हणजेच,

पाया = १०    १० -- ९ = १    ९ : १

             १० -- ९ = २    ८ : २

वर दाखविल्याप्रमाणे या अंकाखाली एक आडवी रेघ व मध्येच तिरकी रेघ मारायची. या तिरक्या रेघेच्या डावीकडचा भाग चार पद्धतींनी मिळवता योते.

जसे ; (१)  १ + २ = ३

आणि पाया  १० -- ३ = ७

(२)  ९ + ८ = १७

आणि  १७-१० = ७

(३)  ९ -- २ = ७

(४)  ८ - १ = ८

वरील चारही पद्धतींनी उत्तर एकच येतं; परंतु आपण तिसरी किंवा चौथी पद्धत उपयोगात आणू.

आता उजवीकडील भाग मिळवण्यासाठी विसर्ग चिन्हाच्या उजवीकडे असणाऱ्या संख्यांचा गुणाकार करावयाचा.

म्हणजेच - १ x २ = २ हे तिरक्या रेषेच्या उजवीकडे लिहायचे

म्हणजेच  ९ : १

          ८ : २

          ७ / २

यावरून उत्तर मिळाले **७२**

आता दुसरे एक उदाहरण घेऊ

जसे, ७ x ४

वरील पद्धतीप्रमाणे हे असे सोडवता येईल.

७ : ३    १० -- ७ = ३    पाया = १०

४ : ६    १० -- ४ = ६

१ / १८

पण वरील उत्तर चुकीचे आहे. होय ना ? अशा वेळी पायामध्ये जितकी शून्ये आहेत तेवढेच अंक तिरक्या रेषेच्या उजवीकडे ठेवायचे आणि जास्तीचे अंक हातचे समजून डावीकडच्या अंकात मिळवायचे. म्हणजेच,

७ : ३    इथं डावीकडील १

४ : ६    + उजवीकडील १

१ / १८   ( हातचा ) २

म्हणजे,

७ : ३
४ : ६
२ / ८

याचाच अर्थ उत्तर २८ होय. याच पद्धतीने दोन अंकी संख्यांचाही गुणाकार करता येईल.

उदा. ९७ x ८८

९७ : ०३    १०० -- ९७ = ०३
८८ : १२    १०० -- ८८ = १२
८५ / ३६    उत्तर = ८५३६

आता समजा पायापेक्षा गुण्य मोठा आणि गुणक लहान असेल तर ? उदा. १२ x ९ हे उदाहरण असे सोडवता येईल.

१२ : २    १२ -- १० = २    पाया = १०
०९ : $\overline{१}$    ०९ -- १० = -१
११ / $\overline{२}$
= १०८

आता हे १०८ कसे आले ? या उदाहरणात तिरक्या रेषेच्या डावीकडे आहेत ११ तर पाया आहे १०. म्हणजेच ११ ची स्थानिक किंमत ११x१० = ११०. या ११० मध्ये तिरक्या रेषेच्या उजवीकडे असलेली संख्या म्हणजेच इथं आहेत $\overline{२}$ ; म्हणजेच -- २ ! म्हणजेच ११०-- २ = १०८

पाया १०० आणि १००० असणारी उदाहरणेसुद्धा याच पद्धतीने सोडवता येतील. पण समजा उदाहरण थोडेसे वेगळेच असेल तर ? म्हणजे उदा. ४१ x ४४ अशा उदाहरणात पाया हा गुण्य व गुणक यांना अनुरूप करून घ्यायचा कसा ?

समजा, आपण १०० हा मूळ पाया धरला, तर वरील दोन्ही संख्यांना जवळ असणारा पाया म्हणजे-

१०० भागिले २ = ५० म्हणून पाया ५०

आता उर्वरित पद्धत नेहमीप्रमाणेच,

४२ : ८
४८ : २
४० / १६

आता ४०१६ हे जे उत्तर आले ते ५० हा पाया धरून होय. यासाठी आपण मूळ पाया १०० ला २ ने भागले. हीच क्रिया डावीकडच्या संख्येवर करायची म्हणजेच,

४० भागिले २ = २० उजवीकडील भाग आहे तसाच ठेवायचा. म्हणजेच उत्तर आले २०१६. येथे ४० ही सम संख्या असल्याने २ ने भागणे सहज शक्य झाले. पण विषम संख्या येथे असती तर ? आपण एक उदाहरण पाहू. जसे, ४१ x ४४

४१ : ९    पाया = ५०    ४१ -- ५० = $\overline{९}$
४४ : ६    ४४ -- ५० = $\overline{६}$
३५ / ५४

आता ३५ ची स्थानिक किंमत ३५०० आहे. याला २ ने भागू व ५४ मिळवू.

३५०० -- २ = १७५० + ५४ = १८०४

म्हणून ४१ x ४४ = १८०४

आता वर्ग काढण्याची काही उदाहरणे पाहू.

**। यावदूनं तावदूनीकृत्य वर्गं च योजयेत ।**

**अर्थ** - वर्ग करण्यास संख्या ( पायापेक्षा ) जितक्यानं कमी तितकेच संख्येतून आणखी कमी करायचे. संख्या आणि पाया यांच्यातला हा जो फरक त्यांचा वर्ग करावयाचा.

समजा, आपणांस ९ चा वर्ग करावयाचा आहे. आता ९ हे दहापेक्षा एकने कमी आहेत. म्हणजेच तेवढे नऊमधून वजा करावयाचे.

९ -- १ = ८

हा झाला डावीकडील भाग. उजवीकडील भाग मिळवण्यासाठी हा जो फरक आहे त्याचा वर्ग करायचा. म्हणजेच,

९ चा वर्ग = ( ९--१ ) / चा वर्ग

९ चा वर्ग = ८ / १

९ चा वर्ग = ८१

आता आपण ९८ चा वर्ग करू. पाया = १००.

आता ९८ हे १०० पेक्षा २ ने कमी !

म्हणून ९८ चा वर्ग = ( ९८--२ ) / २ चा वर्ग

म्हणून ९८ चा वर्ग = ९६ / ०४

म्हणून ९८ चा वर्ग = ९६०४.

पण समजा हीच संख्या पायापेक्षा मोठी असेल तर ? **उदा.** ( १२ ) चा वर्ग किंवा (१०५) चा वर्ग इथे फरक एवढाच करायचा की संख्या पायापेक्षा जितकी मोठी तितके त्या संख्येत मिळवायचे व फरकाचा वर्ग करायचा.

१) १२ चा वर्ग = (१२ + २ ) / २

म्हणून १२ चा वर्ग = १४ / ४

म्हणून १२ चा वर्ग = १४४

२) (१०५) २ = (१०५ + ५) / ५ चा वर्ग

(१०५)२ = ११० / २५

(१०५) २ = ११०२५.

समजा दिलेली संख्या पायाच्या जवळ नसेल तर ? **उदा.** ( ५४ ) २ या संख्येला जवळचा पाया म्हणजे ५०. आणि ५४ = ५० + ४.

म्हणून (५४) २ = (५४ + ४) / ४ चा वर्ग

म्हणून (५४) चा वर्ग = ५८ / १६

= २९ / १६

म्हणून (५४) चा वर्ग = ५८ - २ / १६

म्हणून (५४) चा वर्ग = २९१६

आता शेवटी, ५ ही संख्या एकक स्थानात असणाऱ्या संख्यांचा वर्ग पाहू.

**उदाहरणार्थ** - (१५) २

येथे प्रथम ५ चा वर्ग करावयाचा

(५) २ = २५

डावीकडची संख्या मिळवण्यासाठी मूळ संख्येस तिच्याहून एकने जास्त असणाऱ्या संख्येने गुणायचे. वरील संख्येचा विचार करता-

१ x २ = २

यावरून उत्तर आलं,

(१५)२ = २२५.

आणखी काही उदाहरणे पाहू.

(१) (६५)२ = ७ x ६ / २५

(६५)२ = ४२२५.

(२) (१९५) २ = १९ / ५

(१९५) २ = १९ x २० / २५

(१९५) २ = ३८०२५.

अशाच पद्धतीने एकक स्थानात ५ असणाऱ्या सर्व संख्यांचे वर्ग आपण काढू शकतो.

तर अशा अनेक पद्धतींनी वैदिक गणितातील मजा व विविधता आपण अनुभवू शकता.

**मेघाली लोंबर**
अकरावी विज्ञान

# या जन्मावर . . .
# या जगण्यावर . . .

विज्ञानयुगानं तुम्हाआम्हास कसं यंत्रबद्ध आणि चाकोरीबद्ध केलंय. कधीतरी या साऱ्या चौकटी तोडून आपण काही वेगळं अनुभवण्याची मर्यादित आकांक्षा बाळगून असतो. या आकांक्षा पुरवण्यासाठी सहाय्यभूत होतात त्या हास्य, अश्रू, प्रेम, दुःख, सुख इ. भावना आणि जाणीवा ! फुरसतीचे, विरंगुळयाचे अनेक क्षण आपण अनेक प्रकारे व्यतीत करतो. निसर्ग, चित्रकला, संगीत, शिल्पकला, साहित्य इत्यादी मार्गांनी आपण ज्ञान, मानसिक शांती मिळवण्याचा यत्न करत राहतो. त्यामुळेच कलावंत व्यक्तीस जनमानसामध्ये एक वेगळे स्थान मिळत राहते. अशाच तीन थोर कलावंतांच्या वयाच्या नाबाद पंचाहत्तरीबद्दल आपण सर्वांनी शुभेच्छा द्यायच्या आहेत.

हास्य ही निसर्गाने मानवास दिलेली अपूर्व आणि अनमोल देणगी ! हसरा चेहरा नेहमीच पहावासा वाटतो. नेहमी खदखदून, मनसोक्त हसणारा माणूस हा बराच काळ मानसिक तणावांपासून मुक्त आणि म्हणून शारीरिक अस्वाथ्यापासून दूर राहतो. मराठी माणसाला गेली चाळीस वर्षे खदखदून हसवणारा आणि महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्त्व म्हणून लाडका झालेला असामी म्हणजे 'पु. ल. देशपांडे !' विनोदी साहित्य, एकांकिका, नाटके, चित्रपट, संगीतकला, वक्तृत्व या षड्रसांनी शरीरात वाहत्या रक्तासवेच घेऊन आलेल्या पु. लं. नी मराठी माणसाला अनेक सुसह्य हसरे क्षण दिले. याशिवाय पु. लं. च्या रक्तात आणखी एक अत्यंत महत्त्वाचा रस आहे; तो म्हणजे उदारतेचा ! आजवर या असामीने जवळजवळ चाळीस लाख रुपये देणग्यांच्या स्वरूपात विविध संस्थांना त्यांच्या सांस्कृतिक कार्यास चालना मिळवून देण्याच्या उद्देशाने दिले आहेत. पण या कार्याबद्दल कुठेही फारशी वाच्यता नाही. आजवर विविध सरकारी, सांस्कृतिक सन्मानांनी गौरविल्या गेलेल्या पु. लं. ना 'रसिक मायबाप' प्रेक्षकांचीच दाद त्याहून महत्त्वाची वाटते. इथंच या असामीचं असामान्यत्व सिद्ध होतं.

अशीच एक पौर्णिमेची रात्र होती. धुंद, दुधाळ, हातात धरता येईल असे वाटणारे चांदणे दारासमोर लख्ख सारवलेल्या अंगणात पडलेले होते. फुरसतीचे क्षण होते. अंधाराच्या सावल्यांना हुलकावणी देत नजर चंद्रावर गेली आणि नकळत मनात सूर उमटायला लागले . . . "तोच चंद्रमा नभात. . .!" सुधीर फडके ऊर्फ बाबूजी हा सूरही याचवर्षी पंचाहत्तरीत गेला पण देहानं ! मनानं मात्र, सुरांच मध्यसप्तक अजूनही समर्थपणे तोलून धरलंय; तारुण्याच्या हिरवेपणासारखं ! सहज ओठांवर यावी, पाठ करावी, जाताजाता गुणगुणावी आणि सर्व क्लेशांचा विसर पाडणारी शेकडो गाणी बाबूजींनी मायमराठीच्या साजावर शृंगारिली. भावगीते, भक्तीगीते, अभंग चित्रपटगीते इत्यादी गायनप्रकार जनमानसात त्यांनी लोकप्रिय केले. महाराष्ट्र वाल्मिकी कै. ग. दि. माडगूळकरांचे 'गीतरामायण' तर गेली पन्नास वर्षे मराठी मनामध्ये लेण्यासारखं कोरलं गेलंय. गदिमा, शांता शेळके, ना. घ. देशपांडे यांसारख्या शब्दप्रभूंच्या आशयघन शब्दांना तशीच आशयपूर्ण चाल द्यावी बाबूजींनीच आणि ती चाल शब्दांना-सुरांना धक्का न लावता पूर्ण भावनाविवशतेने गावी बाबूजींनीच !

मायमराठीला आणखी एक देखणं नक्षत्र लाभलं, ते म्हणजे एका कवीचं ! त्यांचं नाव विंदा करंदीकर ! वृत्तीनं बंडोखर म्हणूनं प्रसिद्ध असलेल्या विंदानीही याचवर्षी आयुष्याचा हीरकमहोत्सव साजरा करण्यास सुरुवात केलीय. योगायोगाचा भाग असा की याच वर्षी मराठीतील 'आद्य बंडखोर' कवी श्री. बा. सी

मर्ढेकर यांच्या पहिल्या कवितेच्या जन्मास पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत. या वर्षी विं. दा. करंदीकरांना 'जन्मस्थान' आणि 'कबीर' हे मानाचे पुरस्कार प्राप्त झाले. काव्य हा प्रतिभेचा भाग असला तरी साहित्यिक व्यासंग, समाज निरीक्षण, बऱ्यावाईट अनुभवांचे अलिप्ततेने केलेले रसग्रहण, निसर्गाबद्दलचे प्रेम, भावनांची उत्कटता यांमुळे मनावर घडणारा तो एक संस्कार आहे असेच विंदा मानतात. हा संस्कार आधी होतो आणि मगच कविता जन्म घेते. 'धृपद', 'स्वेदगंगा' इ. काव्यसंग्रहांमधून आपल्या प्रतिभेच्या गरुडभरारीने थक्क करणाऱ्या विंदांनाही सरकारी व सांस्कृतीक पुरस्कार अनंत लाभले. तरीही ते स्वतःस वेगळेपण न देता सूर्यकिरणासारखे अलिप्त राहून सर्वत्र वावरतात, मुलांत खेळतात, चिंतनशील मनाने सर्वत्र पाहातात.

'अनुसूयेपोटी' जन्माला आलेले हे हास्य, सूर आणि काव्य असे 'दत्तात्रेयच' आहेत. त्यामुळे या गुरुपदांना वंदन हे हवंच ! त्यांच्या नाबाद शंभरीसाठी व आरोग्यासाठी त्यांना हार्दिक शुभेच्छा !

**संगीता सारंग**
तृतीय वर्ष विज्ञान



# रवीन्द्रनाथ टागोर - एक सहजसुंदर व्यक्तिमत्त्व

केवळ भारतच नव्हे तर संपूर्ण जगात रवीन्द्रनाथांचे नाव माहीत नसणारे लोक फारच थोडे असतील. मुघल सम्राटांसारखा तलम पायघोळ झगा, संस्कृत पंडितांची सुश्लिष्ट आचरणशैली, इंग्रजी शिष्टाचारातला संयम, संस्था चालवण्याचे व्यवहारकौशल्य, बोलण्यातील मितभाषीपणा, पर्शियनांची सूक्ष्म, समृद्ध फलदृष्टी आणि अनेकांत एकात्वाचा साक्षात्कार अनुभवणाऱ्या हिंदू वैदिकांचा द्रष्टेपणा अशा कितीतरी गुणांचा वेधक आणि प्रेरक संगम रवीन्द्रनाथांच्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वात झालेला होता. कलकत्ता येथे ७ मे १८६१ रोजी जन्मलेल्या रवीन्द्रनाथांचे घर हेच विद्यापीठ होते. संगीत, चित्रकला, साहित्य इत्यादी सर्व गोष्टींचा मिलाफ या विद्यापीठात होता.

अशा सुशिक्षित आणि कलाप्रेमी घराण्यात जन्म झाल्यामुळे स्वभावतःच त्यांना निसर्गाचे अत्यंत वेड होते. नित्यनव्या संवेदनांनी आणि स्पंदनांनी नाथांचे हृदय उचंबळून वाहात असे. सूक्ष्म, उत्कट आणि तरल भावनांनी त्यांचे अंतःकरण सदैव भरलेले असे. ते खरे एकांतप्रिय होते. मनातल्या कल्पनांचा विकास करण्यासाठी एकांतात रहाणे योग्य असे त्यांचे मत होते. त्यांच्यासमोर कवी कालीदासांचा आदर्श होता. काव्याबद्दल बोलताना ते म्हणत -

"अपूर्ण वास्तवता व पूर्ण कल्पनाशक्ती यांच्या संयोगात काव्याचे सौंदर्य आहे. खरे तर वास्तवतेत अनेक गोष्टी अपूर्ण असतात. प्रतिभेच्या सहाय्याने कवी त्यांना पूर्णत्व बहाल करतो."

प्रेमभावना आणि सौंदर्याची आराधना ह्या दोन्ही गोष्टी त्यांच्या काव्यात प्रकर्षाने आढळतात. त्यांचे मन वेगवेगळ्या अनुभवांच्या ग्रहणासाठी नेहमीच फोटोच्या ओल्या प्लेटसारखे संवेदनशील असे. सन १९१३ मध्ये त्यांचा 'गार्डनर' हा इंग्रजी काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. त्यांचा दुसरा, बंगाली कविता असणारा काव्यसंग्रह म्हणजे 'गीतांजली' होय. या कवितांत त्यांच्या भावनेची उत्कटता, गूढता आणि परमेश्वराबद्दलची निस्सीम ओढ ठळकपणे जाणवते. ते म्हणतात -

" The shorud that covers me is a shorud of dust & death. I hate it yet hag it in love; my debts one large, my failures great, my shame secrete & heavy !"

त्यांच्या जीवनात अनंताला स्पर्श करणारे अनंत क्षण येऊन गेले. त्यांना वाटे परमेश्वर अंतर्यामी आहे. जो दुर्बल असेल तोच संकटांनी खचून जाईल. जो समर्थ असेल तोच अधिक धैर्यशाली होईल. त्यावेळी तो स्वतःच ईश्वर आहे याचा प्रत्यय येईल. आपल्या अशा क्षणांबद्दल ते म्हणत,

"I am sure that there have come moments in my own experience when my soul had touched the infinite !"

सन १९२० नंतर त्यांनी जगप्रवास केला. या प्रवासात त्यांना वेगवेगळे अनुभव मिळाले. त्यांच्या जर्मनभेटीत त्यांना एक अविस्मरणीय, विलक्षण अनुभव मिळाला. एके ठिकाणी, त्यांना पाहून दोन चिमुकल्या मुली त्यांच्याकडे धावत आल्या. त्यांना त्या मुलींनी फुले दिली. त्यापैकी एकीने "आम्हांला भारताविषयी प्रेम आहे !" असे सांगितले. त्यावर नाथांनी "तुम्ही भारतावर प्रेम का करता ?" असे विचारले. त्यांच्या या प्रश्नाला "तुम्ही ईश्वरावर प्रेम करता म्हणून !" असे त्या मुलीने उत्तर दिले. तेव्हा त्यांनी म्हटले होते "परमेश्वरावर प्रेम आणि भक्ती असणाऱ्या देशाची जग प्रतीक्षा करीत आहे !"

सन १९३० मध्ये त्यांनी रशियाला भेट दिली. तेथील प्रगती पाहून त्यांना समाधान वाटे. तेथील वास्तव्यात त्यांनी आपल्या मित्रास अनेक पत्रे लिहिली. नंतर तीच पत्रे 'लेटर्स फ्रॉम रशिया' या नावाने प्रसिद्ध झाली.

अशा या रवीन्द्रनाथांना साहित्यातले नोबेल पारितोषिक मिळाले. त्यावेळी ते म्हणाले,

"हा मधाचा पेला केवळ ओठांस लावण्यापुरताच आहे. त्यातील मध मी पिऊ शकत नाही."

इंग्रज सत्तेने बहाल केलेली 'सर' ही सन्माननीय पदवीदेखील मातृभूमीच्या प्रेमाखातर त्यांनी इंग्रज सत्तेस परत केली होती. ऑगस्ट १९४० मध्ये ऑक्सफर्ड विद्यापीठाने त्यांना डॉक्टरेट बहाल केली. त्यानंतर ते खूप आजारी पडले. १९४१ मध्ये त्यांचा ८० वा वाढदिवस शांतीनिकेतनमध्ये साजरा करण्यात आला. पण त्यांची प्रकृती ढासळतच गेली. शेवटी ७ ऑगस्ट १९४१ रोजी त्यांची जीवनज्योत अनंतात विलीन झाली.

ज्यावेळी त्यांना मृत्यूची चाहूल लागली तेव्हा ते लिहितात,

"At this time of parting, wish me good luck my friends ! The sky is flushed with the dawn and my path lies beautiful ! Ask me not what I have to take there. I start on my journey with empty hands and expectant heart. I love this life. I know, I shall love death as well !

अमर आनंदाकडे, अपार आनंदाकडे जाणाऱ्या यात्रीला ही अशीच वाट चालावी लागते. पण त्यांच्या रक्तबंबाळ पावलांच्या ठशागणिक मंगलाची चिरसुंदर रक्तकमळे उमटलेली असतात. त्यातूनच युगाच्या चैतन्याचा सुगंध दरवळत असतो.

अशा रवीन्द्रनाथांना आपण विसरणे शक्य आहे का?

**मनीषा करंदीकर**
द्वितीय वर्ष कला

# वारस

२३ मार्च २०४३ ! प्रशांतच्या जीवनात खळबळ उडविणारा दिवस होता. आणि त्या दिवसापासून प्रशांत - दूर्बिण - संगणक असे त्रिकूट अविरत झटत होते. तो धूमकेतूच असावा. तो आपल्याच सूर्यमालेचा ग्रह का नसावा ? की धुलीकणांचा गोळा की नुसताच भास. शेवटच्या मुद्यावर येऊन प्रशांतची विचारशृंखला तुटली. परत परत पडताळा करूनही त्याचे समाधान होत नव्हते. संगणक तर चुकणार नाही आणि महाकाय दूर्बिणीच्या अचूकतेबद्दल तर त्याला शंकाच नव्हती.

अखेर कलकत्त्याला हेडऑफिसशी संपर्क साधण्याचा प्रशांतने निर्णय घेतला. प्रत्यक्ष चौकशीसाठी प्रशांतला बोलावण्यात आले. नंतरचे दिवस अत्यंत धावपळीचे होते. सर्व जागतिक खगोलशास्त्रज्ञांची बैठक बोलावण्याचा निर्णय डॉ. अय्यर यांनी घेतला.

कलकत्त्यातील फ्रँक हॉल सर्व शास्त्रज्ञांच्या उपस्थितीने सजला होता. सर्व शास्त्रज्ञांच्या चेहऱ्यावरील प्रश्नांची कोळीष्टके स्पष्ट दिसत होती. डॉ. अय्यरनी शांततेचा भंग केला. सभेमागील प्रयोजन व नंतर त्याविषयावरील उपलब्ध माहिती असे त्यांच्या भाषणाचे स्वरूप होते. प्रशांतने आपला अनुभव सर्वांसमोर मांडला. अर्थात यापूर्वीच बहुतांशी शास्त्रज्ञांनी या घटनेची खात्री केली होती. त्या ग्रहाची ( ? ) स्थिती, भ्रमणगती याविषयी माहितीची उजळणी करण्यात आली. अखेर ३ मे रोजी मद्रासवरून अवकाशात त्या ग्रहाच्या दिशेने अवकाशयान सोडण्याचे नक्की करण्यात आले. अर्थातच यानाचा प्रमुख असणार होता प्रशांत !

३ मे. पहाटेचे ४ वाजून १२ मिनीटे. मद्रासवरील अवकाशात एक यान झेपावत होते. प्रशांतच्या मनात बऱ्याच शंका होत्या पण चित्त शांत ठेवून काम करण्याचा प्रशांतचा निर्धार होता. तशी ही काही प्रशांतची पहिली अवकाशयात्रा नव्हती. आठ दिवसांचा प्रवास होता. पहिले चार दिवस उपलब्ध माहितीवर अधिक काही प्रकाश पडतो का यामध्येच गेले. यानात एकूण तीनच माणसे होती. प्रशांत, डॉ. रामानायडू व दिलीप देसाई. डॉ. रामानायडू कलकत्त्याला हेडऑफिसमध्ये काम करीत तर दिलीप देसाई प्रशांतचा सहकारी.

११ मे रोजी यान त्या वस्तूभोवती प्रदक्षिणा घालत होते व त्या वस्तूचे फोटो घेत होते. मिळालेल्या फोटोवरून व समोर दिसणाऱ्या वस्तूवरून हे स्पष्ट होत होते की, तो ग्रहही नव्हता व धूमकेतूही नव्हता, ते एक यान होते; ग्रहाच्या आकाराचे ! प्रशांतकडील अद्ययावत कॅमेऱ्याची किरणे त्या यानाच्या बाह्यपृष्ठभागाला छेदण्यात असमर्थ ठरत होती. एव्हाना त्या यानाची छायाचित्रे पृथ्वीवर आली होती व प्रशांतही पृथ्वीवर संपर्क साधून होता. अखेर परत एकदा जागतिक खगोलशास्त्रज्ञांनी चर्चा करून या निर्णयापर्यंत आले की प्राथमिकरित्या लेसर किरणांचा मारा करून ते एका बाजूने उघडण्याचे ठरले.

पहिल्याच प्रयत्नात यान उघडण्यात आले. मग आतील वस्तूंची अतिसूक्ष्म छायाचित्रे घेण्यात आली. ती मोठी चित्रे पाहून प्रशांतला चक्कर येते का असेच क्षणभर वाटले. पण तरीही प्रत्यक्ष पाहणी करणे भागच होते. आता काही धोका नाही याची खात्री करून प्रशांत त्या गूढ यानात शिरला व एकदम थिजल्यासारखा झाला. एक एक वस्तू हाताळताना आपण या विश्वात जो मानवजातीचा टेंभा मिरवतो, तो किती क्षुद्र पदार्थ आहे याची खात्री पटली. प्रशांतला शरमल्यासारखे झाले. पण पाठोपाठ मिळणाऱ्या आश्चर्याच्या धक्क्यातून तो सावरत होता.

त्या यानातील प्रत्येक वस्तू काळजीपूर्वक न्याहाळत प्रशांतसोबत आडाखेही बांधत होता. आपले संगणक,

यंत्रमानव, मानवाने ज्या वस्तू कल्पिल्याही नसतील - अशा इलेक्ट्रॉनिक्सच्या वस्तू, अद्ययावत अवकाशयानांचे आराखडे, कितीतरी क्लिष्ट आकडे, चित्रलिपी, अंतराळवीरांचे पोशाख, नानाविध वस्तूंची चित्रे, प्रशांतला वाटत होते की हे सर्व बावीसाव्या शतकातीलच आहे. एखाद्या घटनेची टप्प्याटप्प्यातील सुबक मांडणी आणि या सगळ्याची हद्द झाली जेव्हा प्रशांतने मानवाचा फोटो पाहिला. हो, तो मानवाचाच फोटो होता ! तिथल्या अनेक वस्तू व भरपूर चित्रलिपींची अमानत घेऊन प्रशांत यानात पोहोचला. परतीच्या प्रवासात चित्रलिपीचा अभ्यास करणे, चित्रफितीचे सूक्ष्मनिरीक्षण करणे यात वेळ जात होता. चित्रफिती व्हिडीओवर पाहू शकत नव्हता कारण त्यांचा आकार ! तेच ध्वनीफितींच्या बाबतीत !

२५ मे २०४३ ! मानवाचा इतिहास बदलणारा दिवस! कलकत्त्याच्या फ्रँक हॉलमध्ये जागतिक शास्त्रज्ञांची कॉन्फरन्स होती. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर वेगवेगळे भाव होते. ध्वनीफिती तसेच चित्रफितींच्या स्वरूपात बदल करून त्याचे अवलोकन केल्यावर मानवाला आश्चर्याचा धक्काच बसला होता. हजारो वर्षांपूर्वी ते पृथ्वीवर आले होते. त्या जिवांचाच मानव वारस होता. ते केनिक तारकासमुहातील लोक होते. त्यांनीच आपल्या अस्तित्वाचे दाखले सूर्यमालेत सुरक्षित ठेवले होते.

आपण अतिप्रगत सजीवाचे वारस आहोत हे प्रशांत सिद्ध करू शकला. प्रशांतची दूर्बिण केनिक तारकासमूहाच्या दिशेने रोखली होती.

**समीर जाधव**
तृतीय वर्ष विज्ञान



# दुसऱ्याचे मन वाचता आले तर !

सुप्रसिद्ध कवयित्री बहिणाबाई म्हणतात - "असं कसं देवा हे असं कसं रे घडलं । जागेपणी देवा तुला काय सपान पडलं." माणसाचे मन म्हणजेच देवाला जागेपणी पडलेले स्वप्न आहे. मनाला अनेक उपमा दिल्या जातात. आभाळाएवढे विशाल मन, शिरीषासारखे कोमल मन, धरित्रीसारखे उदार मन, द्राक्षासारखे रसाळ मन, विजेसारखे सचेत मन, गंगेसारखे पावन मन. असे हे मन इतके गुंतागुंतीचे आणि अद्‌भूतरम्य आहे की, हे मन वाचण्याचे सामर्थ्य आपल्याला प्राप्त झाले तर !

काही प्रमाणात आपण मन वाचू शकतो. आई मुलाचे मन वाचू शकते. पती-पत्नी, प्रियकर-प्रेयसी, जिवलग मित्र एकमेकांची मने वाचू शकतात. पण किती ? हे सामर्थ्य एखाद्या हिमनगाप्रमाणे असते. दिसणारा हिमनग हा संपूर्ण हिमनगाच्या एक नवमांश असतो. आपल्याला दुसऱ्याच्या मनाचा जो भाग वाचता येतो तो इतकाही नसतो. वर्तमान स्थितीमध्ये फारच थोडे विचार अंदाजाने वाचायचे सामर्थ्य माणसाजवळ आहे. त्यामुळे मनातील नऊ दशांश विचार, भावना कळत नाहीत. प्रत्येकाला त्या इतरांना स्पष्ट करून सांगाव्या लागतात आणि इतरांना ती व्यक्ती सांगेल त्यावर विश्वास ठेवावा लागतो. बऱ्याचदा माणसाच्या मनात नसूनसुद्धा केवळ उपचार म्हणून, समोरच्या व्यक्तीला बरे वाटावे म्हणून, तिला रुचेल असे त्याला बोलावे लागते. जर मन वाचण्याचे सामर्थ्य मिळाले तर लपवून ठेवलेल्या अनेक कटू भावना प्रकट होतील.

कधी कधी आपले मन वाचले तर काय आढळते ? आपण फिरायला बाहेर पडत असतो, तेवढ्यात एखादा परिचित हजर होतो. आपण मनात चरफडतो. कधी नव्हे ते आज कुठे जरा खुल्या हवेत फिरायला बाहच पडत होतो तर आली ही पीडा ! पण समोरच्या व्यक्तीला आपण असे म्हणत नाही. उलट चेहऱ्यावर उसनं हास्य आणून म्हणतो, "नशीब, दोन मिनीटे तरी उशीर केला असता तर आपल्या सहवासाला आम्ही मुकलो असतो." अशावेळी आपल्या मनातल्या खऱ्याखुऱ्या भावना पाहुण्यांना कळल्या तर ? कल्पना करा काय होईल ते ! अशातऱ्हेने मनातले खरे लपविण्यासाठी काळजी घ्यावी लागते. अध्यापक, प्राचार्य, आई-वडील यांना अभ्यास टाळण्यासाठी सबबी सांगताना फार दक्ष राहावे लागते. आपल्या मनाचा सुगावा लागू न देण्याची खबरदारी न घेतल्यास चिमणरावांनी स्पष्टवक्तेपणाचे प्रयोग आरंभल्यावर त्यांना लोकांचा जो अनुभव आला तोच थोड्याफार फरकाने प्रत्येक माणसाला येईल. म्हणून द्रष्ट्यांनी म्हटले आहे,

**"सत्यं ब्रुयात, प्रियं ब्रुयात**
**न ब्रुयात सत्यम् अप्रियम् ! "**

सत्य बोला, प्रिय बोला परंतु जे सत्य परंतु अप्रिय आहे ते बोलू नका. जगातील माणसामाणसांतील संबंधात जे काही थोडे सौहार्द, आपुलकी आहे ते मन वाचण्याची विद्या अवगत नसल्यानेच आहे. मनात कोणत्याही भावना असल्या तरी समोर आल्यानंतर मत्सर, हेवेदावे मनातच लपवून ठेवावे लागतात आणि दाखवले जाते ते फक्त प्रेम. पण मन वाचता यायला लागल्यावर दुसऱ्याच्या बोलण्यावर, आश्वासनावर, वाटाघाटीवर कुणी विश्वासच ठेवणार नाही. संपूर्ण सत्यच डोळ्यांसमोर अवतरेल. प्रत्येक माणूस दुसऱ्याचा वैरी होईल. न्यायदानाच्या प्रक्रियेत वकील आणि साक्षीदारांचे महत्त्वच संपेल. मन वाचता आल्याने न्यायाधीशाला खरे कारण समजेल व फक्त गुन्हेगारांलाच शासन होईल. तसेच मन वाचण्याचे सामर्थ्य मिळाले तर तोंडपूजेपणा करणे, तोंडदेखलेपणाने

वागणे, देखल्या देवाला दंडवत घालणे आपोआपच बंद होईल. सध्या भींतीला असलेले कान नाहीसे होऊन भींती बहिऱ्या होतील. मनोरुग्णांची मने वाचता आल्याने त्यांच्यावर सुलभतेने उपचार करता येतील. प्रत्येकाला स्वतःचे दुर्गुण सुधारणे सोपे जाईल. परीक्षेत कॉपी करणे, पेपर फोडणे, उत्तरपत्रिकात गुण वाढविणे अशा गोष्टी घडणार नाहीत.

आपल्या मनातील कोणताही विचार दुसऱ्याला समजतो हे कळल्यावर माणसे वाईट विचार करणे सोडून देतील. ढोंग, हेवेदावे, वैर सोडून सत्प्रवृत्तीने राहाण्याचे ठरवतील आणि सर्व दुरितांचे तिमीर गेल्यावर पृथ्वीवर स्वर्ग अवतरेल. पण षड्रिपुंशी मैत्री केलेल्या सामान्य मानवाकडून पृथ्वीवर स्वर्ग अवतरण्याची अपेक्षा करणे म्हणजे दिवास्वप्न बघण्यासारखे आहे. चांगल्यापेक्षा वाईटाकडे जाण्याची वृत्ती लक्षात घेता माणूस मन वाचता येण्याच्या सामर्थ्याचा उपयोग वाईटासाठी करेल. त्यामुळे पुन्हा मन वाचता न आले तर ! असे म्हणावे लागेल.

**रंजीता खडपे**
बारावी कला



# टिश्श्यू कल्चर

आज विज्ञान खूपच पुढे गेलेलं आहे आणि ते आज इतके गतीमान आहे की, काल एक शोध लागतो आणि काही दिवसांनी त्याच्याही पुढचा शोध लागून आधीचा शोध खूपच जुना होतो. परंतु अशाही परिस्थितीत काही वैज्ञानीक प्रक्रिया किंवा शोध यांना तेवढेच महत्त्व प्राप्त होते. आणि हे महत्त्व प्राप्त होण्याचे कारण म्हणजे त्या वैज्ञानीक प्रक्रियेचा विविध क्षेत्रातील बहुउद्देशीय उपयोग.

**टिश्श्यू कल्चर म्हणजे काय ?**

टिश्श्यू कल्चर ही एक अशीच वैज्ञानीक प्रक्रिया आहे, की ज्यामध्ये वनस्पतीच्या वाढत्या अवयवांतील काही पेशी वेगळया करून त्या निर्जंतुक स्थितीमध्ये आवश्यक पोषकद्रव्यांवर वाढविल्या जातात आणि त्या पेशी कालांतराने एक नवीन रोप निर्माण करतात. या पेशी वनस्पतींच्या विविध अवयवांतून उदा. झाडाचे मूळ, खोड, पान, परागकोश, अंडाशय इत्यादीतून घेतल्या जातात. त्या पेशी विविध रसायने वापरून निर्जंतुक केल्या जातात. नंतर त्या पेशी प्रमाणबद्ध केलेल्या, पोषक द्रव्य असलेल्या परिक्षानळीत ठेवल्या जातात. अशा हजारो परीक्षानळया एका निर्जंतुक वातानुकूलीत खोलीत विशिष्ट रचनेत ठेवल्या जातात. तिथे त्या खोलीचे तापमान व प्रकाश यांचा सुसंयोग साधला जातो. त्यायोगे त्या पेशींची स्वाभाविक वाढ होते व एका सदृढ रोपामध्ये रूपांतर होते. अशाप्रकारे एका सूक्ष्म पेशीपासून संपूर्ण रोप तयार केले जाते.

आज हे तंत्रज्ञान जगप्रसिद्ध आहे. आपल्या भारतातही हे तंत्रज्ञान विकसीत झालेले आहे. भारतामध्ये मोठमोठ्या संशोधन संस्था या तंत्राचा वापर करून नवनवीन झाडांच्या जाती शोधून काढत आहेत. तसेच शेतीक्षेत्रामध्ये विविध पिकांच्या सुधारीत जाती निर्माण करत आहेत. या तंत्राच्या आधारे एखाद्या पिकाची गुणवत्ता कायम टिकवली जाते. ही गुणवत्ता बियाणे वापरून टिकविली जाऊ शकत नाही.

**या तंत्रज्ञानाचे फायदे काय ?**

**१) काही पेशींपासून असंख्य रोपे -**

या तंत्रज्ञानाचे अनेक फायदे आहेत. ज्या पेशी कल्चरसाठी घेतल्या जातात त्या एका सदृढ सुधारीत जातीच्या मातृवृक्षापासून घेतल्या जातात. अशा असंख्य पेशी कल्चरसाठी वापरल्या जातात. त्या प्रत्येक पेशीचे कल्चर परीक्षानळीमध्ये विभाजन होते व एका पासून अनेक पेशी तयार होतात. नवीन तयार झालेल्या पेशी पहिल्या कल्चर परीक्षानळीतून वेगळया केल्या जातात व त्यापासून आणखी दुसऱ्या सब-कल्चर परीक्षानळया बनविल्या जातात. अशाप्रकारे एका झाडाच्या पेशीपासून हजारो, लाखो कल्चर परीक्षानळया बनविल्या जातात. म्हणजेच एका मूळवंशापासून अनेक रोपे आपण तयार करू शकतो. ही रोपे आपल्या मातृवृक्षापासून जराही भिन्नता दाखवीत नाहीत. तसेच त्यांच्यामध्ये रोगप्रतिबंधक शक्ती व इतर चांगल्या गुणवत्ता कायम राहतात. केव्हा - केव्हा संकरीत बियाणे वापरूनसुद्धा असा परिणाम दिसत नाही. त्याचबरोबर इथे बियाणे रुजण्याच्या टक्केवारीपेक्षासुद्धा जास्त टक्केवारी झाडे जगण्याबाबत मिळते. कारण प्रत्येक पेशीला सारख्याच प्रमाणात पोषक द्रव्याची मात्रा मिळते. टिश्श्युकल्चरपासून निर्माण होणारी रोपे वर्षातून केव्हाही आपण तयार करू शकतो. त्यासाठी ठरावीक ऋतूचीच आवश्यकता हवी असे नाही.

**गुणसूत्रीय संख्येत बदल -**

एकप्रकारच्या टिश्श्यूकल्चरमध्ये असे आढळून आले

आहे की मुख्य कल्चर परीक्षानळीपासून पेशी वेगळ्या करून कल्चर परीक्षानळ्या बनविताना काही पेशी गुणसूत्रीय संख्येमध्ये बदल दाखवितात. याचा फायदा असा की मातृवृक्षापासून अधिक सुधारीत गुणवत्ताधारक रोपे आपल्याला त्या सबकल्चरपासून मिळविता येतात.

**विषाणूंचे उच्चाटन**

विषाणूंपासून झाडांना खूप धोकादायक रोग होऊ शकतात. जेव्हा एखादा मातृवृक्ष या रोगाला बळी पडतो तेव्हा विविध अवयवांमध्ये वेगवेगळ्या प्रमाणात त्या विषाणूंचे अस्तित्व असते. परंतु त्यातल्यात्यात त्यांची संख्या नवीन वाढणाऱ्या अवयवांत ( उदा. नवीन कोवळी पालवी ) खूपच नगण्य असते. अशा स्थितीत मातृवृक्षापासून आपल्याला कसलेच उत्पन्न मिळत नाही. याउलट ते झाड मरण्याची दाट शक्यता असते. अशावेळी त्या कोवळ्या भागाच्या पेशी काढून त्यापासून कल्चर केले जाते व नवीन विषाणूरहीत रोपे तयार केली जातात. याचा उपयोग जास्त प्रमाणात कट फ्लॉवर्सची शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना होऊ शकतो.

**जैविक रसायने निर्माण करणे -**

मानव हा पुरातनकाळापासूनच वनस्पतींवर अवलंबून आहे. अन्नाव्यतिरिक्त कितीतरी गोष्टींसाठी तो आज वनस्पतींवर अवलंबून आहे. जसे वनस्पतीपासून तयार केलेली औषधे, रंगद्रव्ये, व्हिटॅमिन्स, हार्मोन्स, फ्लॉवरींग एजन्टस् इ. वरील सर्व जैविक रसायने आहेत. ती झाडांच्या ठरावीक पेशीमध्ये तयार होतात. याचा अभ्यास या टिश्श्यू कल्चर तंत्रज्ञानामुळे करणे शक्य झाले आहे. त्यामुळे ती जैविक रसायने या पेशींपासून मोठ्या प्रमाणावर निर्माण करता येऊ शकतात.

**आंतरपेशीय संकरीकरण**

एकप्रकारच्या टिश्श्यू कल्चरमध्ये प्रत्येक पेशीमधील गुणसूत्रे बदलता येतात व त्याच्याजागी नवीन गुणसूत्रांचे रोपण केले जाते. ही खूपच गुंतागुंतीची प्रक्रिया असते. परंतु तरीसुद्धा आपल्याला पाहिजे त्या गुणधर्माच्या गुणसूत्राचे त्या पेशीमध्ये रोपण करता येते. त्यामुळे आपल्याला शंभर टक्के संकरीत जात तयार करता येते.

**वेगवेगळ्या पेशीयप्रक्रियांचा अभ्यास -**

टिश्श्यूकल्चरच्या सहाय्याने अनेक पेशीयप्रक्रियांचा अभ्यास करणे शक्य झाले आहे. उदा. पानांमधील प्रकाश संश्लेषण क्रिया, श्वसन क्रिया, वेगवेगळ्या पेशीसमूहामध्ये तयार होणारी रसायने, रंगद्रव्ये, हार्मोन्स व त्याचे वनस्पतीच्या वाढीसाठी होणारे नेमके फायदे याचा सविस्तर अभ्यास संशोधक टिश्श्यू कल्चरच्या सहाय्याने करू शकतात.

म्हणूनच टिश्श्यू कल्चर हे तंत्रज्ञान आजच्या युगात माणसाच्या व नैसर्गिक समतोल राखण्याच्या दृष्टीने खूपच उपयोगी आहे.

**किशोर नाईक**
तृतीय वर्ष विज्ञान

# परिवर्तन . . .

पार्वती चट्कन उठून बसली. तिला काल शेजारी बोलावलं होतं. सासूच्या भीतीमुळे ती काल जाऊ शकली नव्हती. पण आज शेतात जाताना तिनं हा मोका साधला. शेजाऱ्यांकडून तिला भाजी, पोळी केळीच्या पानात बांधून मिळाली होती. तिचं मन आनंदीत झालं पण लगेच मनात धस्स झालं, कारण ही पुडी सासूने पाहिली तर ? म्हणून तिने ती पुडी आपल्या पदरात लपवली. शेतात एखाद्या पहारेकऱ्यासारखी सासू टपलेली असल्याने दिवसभर शेतात राबत राहिली; पुडी तशीच राहिली.

तिन्हीसांजेला घरी आली खरी; पण इथे आल्यावर घरकाम होतंच. त्यात सासूने तिच्या पुढ्यात भुईमुगाच्या शेंगा ठेवल्या. त्या तिला खाण्यासाठी नव्हत्या, तर दाणे काढण्यासाठी होत्या. त्यातूनही एखादा दाणा तोंडात टाकावा तर आत सासूबाई जेवणावर यथेच्छ ताव मारत होत्या आणि एक डोळा होता सूनबाईच्या कामाकडे. रात्रीचे आठ वाजून गेले होते. व्यवहार म्हणून तिने सुनेला जेवायला हाक मारली.

तिचं पान वाढलं. पण तिच्या प्रत्येक घासाकडे सासूची तिखट नजर होती. सूनबाई अधिक जेवू नये म्हणून तिच्या पुढ्यात राहून जणू काही तिचे घास मोजत होती. पार्वतीनं जेवण उरकलं. पुढची कामे आटोपली. आता घरातील सारी झोपायच्या तयारीस लागली. दिवे गेले आणि अर्ध्या तासातच सर्व सामसूम झाले. पार्वतीने संधी साधली आणि पाऊल मात्र वळलं स्वयंपाक घराकडे. कुणालाही जाग येऊ नये म्हणून विजेचा दिवा न लावता रॉकेलचा दिवा लावला. पदरात लपविलेली भाजीपोळी तिने आधाशासारखी खाल्ली आणि पाणी पिण्यास भांडं घेतलं. पण तिचं दुर्दैव आड आलं. हातातील भांडं निसटून लादीवर आदळलं आणि ठणठणाणठण असा आवाज झाला. कुत्र्यासारखी झोप असणाऱ्या सासूला तात्काळ जाग आली. ती उठली, स्वयंपाक घरात आली. सुनेला पाहिलं. सुनेचं तोंड हालत होतं. काय खाल्लंस.? सासूबाईनं प्रश्न केला. पार्वतीनं मौन पाळलं. दुसरा शब्द कडाडला. बऱ्या बोलानं बोल, नाहीतर वाईट परिणाम होतील. आता सूनबाई म्हणाली, 'काही नाही' हे म्हणणं अर्थात खोटं होतं. पण पोटाची खळगी भरण्यासाठी तिचा हा अपराध घडला होता. त्यात आणखी एक पुरावा सापडला. भाजीपोळीचं गुंडाळलेलं केळीचं पान सापडलं. आता मात्र प्रश्नच नव्हता. आधीच वैरी समजणाऱ्या त्या शेजाऱ्याकडून हिने काहीतरी मागून आणलं असावं हा अंदाज बांधला. क्षणात सूनबाईला फरफटत, फरफटत ओढीत घराबाहेर आणली. सून तरुण होती, पण तिच्या नित्य उपासमारीने तिचं तारुण्य, शक्ती लोप पावली होती. उलट म्हातारड्या सासूला बळ आलं होतं. कारण जुनं हाड ना ते !

या सर्व भानगडीत सर्व घरालाच जाग आली. म्हातारीचे दोन्ही मुलगे जागे झाले. धाकटा मुलगा पुढे आला. काय प्रकार चालला आहे त्याला क्षणभर समजलं नाही. पण लगेचच कडाडणाऱ्या आईच्या मुखातूनच सर्व विषय प्रकट झाला.

"शेजाऱ्यांकडील भाजीपोळी खाल्ली म्हणून हे आकांडतांडव !" आई, आजवर बोललो नाही पण आज उघड बोलतो. शेतात मरेपर्यंत काम करून घ्यायचं, मग तिला पुरेसा आहार नको का ? तुझ्या जागत्या पहाऱ्यात काय खाणार ती ? आणि समजा भुकेसाठी तिनं खाल्लं तर काय बिघडलं ?" झालं, एवढे शब्द कानावर पडले आणि सरावाचा पवित्रा सासूने घेतला, तो जीव देण्याचा ! नाटक झालं,

तिने हुबेहूब आपली भूमिका वठवली. पण आजपर्यंत पाच-सहा वेळा असा जीव देण्याचा प्रयत्न तिने केला, पण प्रत्येकवेळी यमच घाबरून पळाला.

दुसरा मुलगा पुढे आला, "काय करतेस हे ? जीव देऊन काय साधणार आहेस तू ? फक्त मागच्यांना त्रास. ताईसाठी आजवर राखलंस ना ? मुलगे तुझे वैरी झाले. जर सुनेला ताईसारखी वागवलीस तर नाही का चालणार ? आजवर तुमच्या या रोजच्या तमाशात मी भाग घेत नव्हतो, पण आज भाग घेतो हा पहिल्यांदाच आणि शेवटचा. तू जर क्षुल्लक कारणासाठी जीव देण्याची धमकी देऊन सर्वांचे धाबे दणाणत ठेवलेस तर तुला या जगात काहीच नको ना ? मग आम्हाला तरी कशाला मोह, तेव्हा आम्हीच सर्व निघून जातो. तू रहा एकटी पृथ्वीच्या पाठीवर. प्रत्येक जीवाचे संरक्षण करणारा तो भगवंत आहेच. तू मात्र रहा एकटी. नाही सुनांचा त्रास, नाही मुलांची कटकट. शेवटच्या क्षणापर्यंत रहा एकटी, आणि शेवटी जाशीलही एकटीच."

क्षणात वातावरण पालटलं. कधी नाही तर आईच्या डोळ्यांत अश्रू आले. मुलाला तिनं जवळ बोलावलं. सुनेलाही हाक मारली, 'पार्वती!' काय चमत्कार ! आईच्या मायेची हाक तिला पहिल्यानेच जाणवली. तिने सुनेच्या गालावरून हात फिरवले आणि म्हटलं, "संपलं बरं का तुझं माझं वैर, आता करू या संसार सुखाचा."

**सरिता गोगटे**
अकरावी कला

# भटकंती किल्ल्यांची

किल्ले हा महाराष्ट्राचा महान ऐतिहासिक ठेवा आहे. स्थलदुर्ग ( भुईकोट ), जलदुर्ग ( जंजिरा ) आणि गिरीदुर्ग ( डोंगरी किल्ले ) हे किल्ल्यांचे प्रकार. डोंगरी किल्ले आणि जंजिरे हे निसर्गसृष्टीच्या दृष्टीनेही अनमोल आहेत. त्यातल्यात्यात डोंगरी किल्ले पाहणे, तेथे भटकण्याचा आनंद घेणे अगदी सर्वसामान्यांनाही सहज शक्य असते. पायी हिंडण्याची आवड असणाऱ्यांना तर डोंगरी किल्ले हा आनंदाचा मोठा ठेवाच आहे. निसर्गाने आपले भांडार तेथे खुले केलेले असते. त्या सौंदर्याचा आपण जितका आस्वाद घेऊ तितका थोडा.

कोकण आणि देश यांना विभागणाऱ्या सह्याद्रीच्या मुख्य रांगेत किंवा त्यांच्या शिखरावर हे किल्ले आहेत. पावसाळयातले हिरव्या मखमली गवताने वेढलेले त्यांचे रूप जसे वेधक असते, तसे एरवीचे राकट कणखर रूपही न्याहाळण्याजोगे असते. इतिहासाच्या पाऊलखुणा जपणारी काळ्या पत्थरातील ही निसर्गलेणी आवर्जून पहावीत अशी आहेत. किल्ल्यांच्या अवघडपणाची अनेकांना धास्ती वाटते. पण अवघड वाटेने जाण्याचा आनंद प्रत्यक्ष अनुभवल्यावर त्यांना कळून चुकते, की हा अनुभव पुनः पुन्हा घ्यावा असा आहे. आणखी एक प्रश्न काहींना पडतो तो असा की किल्ल्यांवर दगडधोंड्यांखेरीज काय पाहण्यासारखे असते ? याला उत्तर खूप सविस्तरपणे देता येईल. पण थोडक्यात सांगायचे तर आपला जिवंत आणि ज्वलंत इतिहास अनुभवून राष्ट्रप्रेम वाढवायचे असेल तर किल्ले अवश्य पाहिलेच पाहिजेत.

काही प्रमुख किल्ल्यांची धावती ओळख येथे करून दिली आहे.

## सिंहगड

नरवीर तानाजी मालुसरे यांच्या पराक्रमामुळे सिंहगड प्रसिद्ध आहे. त्याच्या पायथ्याशी असणारे आतकरवाडी हे गाव पुण्यापासून सुमारे २४ किलोमीटर अंतरावर आहे.

पुण्याहून तेथे जाण्यास 'पीएमटी' च्या बसेस आहेत. चढण कठीण नाही, परंतु डोंगर चढण्याची सवय नसणाऱ्यांची दमछाक होईल असा चढ आहे. समुद्रसपाटीपासून गडाची उंची सुमारे १३०० मीटर आहे. गडावर दूरदर्शनचा मनोरा उभारण्यात आला. तेव्हा वरपर्यंत वाहने जातील अशी सडकही तयार करण्यात आली. पुणे-सिंहगड रस्त्यावरील डोपाजे गावापासून जवळ असलेल्या गोळेवाडी येथून फाटा निघून वर जातो. पायी जाण्याचा आनंद वाहनाने वर जाण्यात मिळत नाही. गडाचे मूळ नाव कोंढाणा ( कोंडाणा ). १६७० मध्ये तानाजी मालुसरे तेथे धारातीर्थी पडले. ते ज्या कड्यावरून दोर लावून चढले तो 'डोणगिरीचा कडा' आवर्जून पाहण्याजोगा आहे. तानाजीचा पुतळा गडावर आहे. राजाराम महाराजांची समाधी आहे. कोंढाणेश्वर व अमृतेश्वर यांची मंदिरे आहेत. लोकमान्य टिळकांचा बंगला हेदेखील गडावरील एक महत्त्वाचे आकर्षण आहे. गडावर टाकी आहेत. त्यातील देवटाके अधिक प्रसिद्ध आहे. गडाच्या दुसऱ्या बाजूला 'कल्याण दरवाजा' आहे. तेथून कल्याण नावाच्या गावापर्यंत वाट जाते. त्या गावापासून पुण्याला एस्. टी. ने जाता येते. गडावर मिळणारे दही-ताक आणि झुणका-भाकरी लक्षात रहाण्यासारखी असते. पुरंदर, तोरणा आणि राजगड या किल्ल्यांचे सिंहगडावरून चांगले दर्शन होते.

## शिवनेरी

पुण्यापासून जुन्नरला एस. टी. ने जाण्यास सुमारे तीन तास लागतात. शिवनेरी जुन्नरला लागूनच आहे. जुन्नरपासून वडज गावाकडे जो रस्ता जातो, त्यावरून काही अंतर गेल्यानंतर एक दत्तमंदिर आहे, त्याच्या जवळ गडाचा पायथा आहे. गडावर जाताना सात दरवाजे आहेत. चढण सोपी आहे. वाटेत पाचव्या दरवाजानंतर जवळच शिवाईचे मंदिर आहे. शिवाजी महाराजांचे जन्मस्थान हे गडावरील पहाण्याचे मुख्य ठिकाण. गंगा-जमना हे जोडटाके त्यातील थंडगार पाण्याबद्दल सिंहगडावरील देवटाक्याप्रमाणेच प्रसिद्ध आहे. जिजामाता व बालशिवाजी यांचे मंदिर गडावर काही वर्षांपूर्वी उभारण्यात आले आहे. त्या मंदिराजवळून एक वाट खाली जाते, पण नवख्यांनी तेथून जाताना काळजी घेणे आवश्यक आहे. आधारासाठी वाटेच्या बाजूने तारा लावलेल्या आहेत. गडाच्या अनेक लेणी आहेत. हा गड सातवाहनकालीन आहे. गडाची समुद्रसपाटीपासूनची उंची सुमारे १०५० मीटर आहे.

## राजगड

शिवाजीमहाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याची सुमारे २५ वर्षे राजधानी असलेला राजगड त्याच्या वैशिष्ट्यामुळे ( वैशिष्ट्यपूर्ण रचनेमुळे ) असाधारण आहे. मध्ये बुलंद बालेकिल्ला आणि तीन बाजूंना तीन माच्या असे याचे स्वरूप आहे. पद्मावती, सुवेळा आणि संजीवनी अशी या माच्यांची नावे आहेत. गडाकडे जाण्यास ज्या वाटा आहेत, त्यापैकी 'चारदिंडीची वाट' आणि पाली दरवाजाची वाट तुलनेने सोप्या व सोईच्या आहेत. पुणे - वेल्हे मार्गावरील मार्गासनी गावाला एस. टी. ने जाता येते. तेथून साखर, चिरमोडी या गावांवरून गुंजवणे गावाजवळच्या दरडीगे वस्तीपाशी आले की चोरदिंडीची वाट सुरू होते. शेवटी वाट कठीण आहे. तेथे आधारासाठी गज आहेत. पाली दरवाजाची वाट आणखी सोपी आहे. तिथे जायचे असल्यास पाली उर्फ पाल या पायथ्याच्या गावापर्यंत एस. टी. ने जाता येते. ( पावसाळ्यात मात्र एस. टी. बहुधा वाजेघरपर्यंतच जाते. पुढे सुमारे तासभर पायी जावे लागते. ) पद्मावती माचीवरील पद्मावती मंदिर, रामेश्वर मंदिर, वा अंबरखाना येथे मुक्काम करता येतो. बालेकिल्ल्यावर जाण्याची वाट याच माचीवरून आहे. ती सोपी नाही. वाटेत आधारासाठी खडकात खोबणी केलेल्या आहेत. राजवाडा, सदर, बाजारपेठ इ. चे अवशेष गडावर आहेत. संजीवनी माचीची 'चिलखती तटबंदी' अतुलनीय आहे. सुवेळा माचीवरील 'नेढे' मुक्काम हा अनुभव अवर्णनीय आहे. पुण्याहून सकाळी निघालो तर तो दिवस आणि दुसरा संपूर्ण दिवस तरी गड पाहण्यासाठी हवा. गडावरून रायगड, तोरणा, सिंहगड यांसह अनेक किल्ले, भाटघरचा जलाशय आदी मोठा परिसर दिसतो. राजगडाची उंची समुद्रसपाटीपासून सुमारे १३५० मीटर इतकी आहे.

## रायगड

दुर्गप्रेमींची पंढरी म्हणजे रायगड, पुणे-मुंबई आदी शहरांतून रायगडला (पायथ्यापर्यंत) थेट एस. टी. बसेस आहेत. चितदरवाजा नावाच्या ठिकाणापर्यंत त्या जातात. प्रत्यक्षात आता तेथे दरवाजाचे अवशेषही नाहीत. तेथून सुमारे १४०० पायऱ्या चढून जावे लागते. ही संख्या मोठी वाटली, तरी चढण अतिशय सोपी आहे. लहान मुलेही सहज जाऊ शकतील, अशी ही वाट आहे. गडावर रायगड जिल्हा परिषदेची धर्मशाळा आणि उपहारगृहदेखील आहे. गंगासागर हा जलाशय आणि अन्य तळी व टाकी आहेत. शिवाजीमहाराजांच्या सिंहासनाची जागा आणि त्यांची समाधी ही गडावरील सर्वांत प्रमुख स्थळे. दोन्ही स्थळी मेघडंबरी आहे व जगदीश्वराचे मंदिर समाधीलगतच आहे. महाराजांचा राजवाडा, सदर, राण्यांचे महाल आदी अनेक इमारतींचे अवशेष आपल्याला त्या काळात घेऊन जातात. रायगडाची

उंची समुद्रसपाटीपासून सुमारे ८०० मीटर आहे. टकमक टोक, वाघ दरवाजा, नगारखाना, हिरकणी बुरूज आणि भवानी टोक येथून निसर्ग न्याहाळणे हा एक अपूर्व आनंद आहे. गडावरून सूर्योदय आणि सूर्यास्त यांची विलोभनीय दृष्ये पाहणे किंबहुना ते वातावरण अनुभवणे हेदेखील अविस्मरणीय असते. या विस्तीर्ण गडावरील प्रमुख ठिकाणे पाहण्यासाठी तेथे किमान दोन दिवस तरी वास्तव्य करावयास हवे. रायगडाच्या पायथ्याशी महाडमार्गे चितदरवाजापर्यंत एस्. टी. ने येणे हा जसा मार्ग आहे तसेच अनेक पाऊलवाटांनाही येऊन पुढे पायऱ्यांच्या वाटेला मिळता येते. देशावरून कोकणात उतरणाऱ्या या पाऊलवाटांना सिंगापूर नाळ, बोराटा नाळ, कावल्या घाट, मढ्या घाट, शेवल्या घाट बोचेघोळ आदी नावे आहेत. पदभ्रमण ( ट्रेकींग ) या प्रकारची ज्यांना आवड आहे आणि त्यातील शारीरिक कष्ट सोसण्याची ज्यांची तयारी आहे, अशांसाठी या वाटा अतिशय आनंददायक आहेत.

**मंगल बोडस.**
प्रथम वर्ष वाणिज्य

# आधुनिक महाराष्ट्राचे समाजवादी संत - सानेगुरुजी

साने गुरुजींची 'शामची आई' वाचली नाही असा एकही वाचक सापडणार नाही. त्यांच्या 'गोड गोष्टींनी किशोरवयातील मुलांना वेडच लावलं. 'दुःखी', 'नदी सागराला मिळेल', 'मनूबाबा', 'सोराब रुस्तम' ही पुस्तके वाचकांनी अधीरतेने वाचली. 'भारतीय संस्कृती' या ग्रंथात त्यांनी हिंदू संस्कृतीचे ठसठशीत चित्र उभे केले. अखेरच्या दिवसातल्या 'सुंदर पत्रांनी वाचकांचे डोळे आनंदाश्रूंनी डबडबले.

साने गुरुजी हे एक उत्तम वक्ते होते. त्यांनी आपल्या व्याख्यानात लोकशाही समाजवादाशिवाय भारताला तरणोपाय नाही ही गोष्ट ठासून व तळमळीने सांगितली. त्यांच्या व्याख्यानांनी व वाङ्मयाने तरुण पिढीवर फार मोठा संस्कार केला. प्रत्येकाने आपल्या कुवतीप्रमाणे धडपडायला हवे ही गोष्ट गुरुजींनी 'धडपडणारी मुलं' यातून शिकवली. स्वतःच्या खाजगी जीवनात त्यांनी समाजवादाचे आचरण केले. शेतकरी, मजूर व गरीबांविषयी त्यांच्या मनात कणव होती. मुलांच्या मेळाव्यात ते रमत असत. त्यांच्याभोवती मुलांचा सतत वेढा असे. मातेचे वात्सल्य त्यांच्या वागण्यातून ओसंडत असे. त्यांची 'शामची आई' हे पुस्तक म्हणजे मराठी भाषेचे अमोल लेणे आहे. गॉर्कीच्या 'मदर' प्रमाणे गुरुजींची 'शामची आई' जगभर गाजली.

गुरुजींचा आपल्या आईवर फार जीव होता. तिचीही त्यांच्यावर फार माया होती. त्यांचे वडील एकेकाळी सधन असले तरी नंतर त्यांची परिस्थिती खालावत गेली. बालपणी गुरुजींनी वार लावून व माधुकरी मागून आपले शिक्षण पुरे केले. आईच्या निधनानंतर त्यांनी जे उद्गार काढले त्यातून आईची महती स्पष्ट होते. "माझ्या आईनेच मला सारे दिले. माझ्यात जे चांगले आहे, जे पवित्र आहे ते सारे तिचे आहे. माझी आई गेली परंतु भारतमातेच्या सेवेसाठी मला तयार करून गेली." गुरुजींनी पुण्यात राहून कॉलेजचं शिक्षण पूर्ण केले. एम्. ए. झाल्यावर खानदेशमध्ये शिक्षक म्हणून नोकरीला लागले. खानदेश हीच त्यांची कर्मभूमी ठरली. त्यांचे शिक्षक म. म. दत्तोपंत पोतदार यांनी उद्गार काढले, "येथून पुढचा काळ पांडुरंग साने यांचा 'साने गुरुजी' या नवीन उज्ज्वल स्वरूपात झालेल्या सुंदर व संस्मरणीय विकासाचा काळ होय." महाराष्ट्राच्या या नवीन गुरुजीने सारा खानदेश ढवळून काढला. शेकडो तरुणांनी त्यांचा आदेश मनोभावे पाळला.

सानेगुरुजी शिक्षक असतानाही भरपूर वाचन व लेखन करीत असत. विद्यार्थ्यांना शिकवण्यात तर ते आपलं सारं अंतःकरण ओतीत. छात्रालय दैनिकातून त्यांनी विद्यार्थ्यांना देशभक्तीचे धडेही दिले. पुष्कळ वाचावे व पुष्कळ विचार करावा असे ते म्हणत. एम्. ए. झाल्यानंतर स्वतःच्या ध्येयाविषयी त्यांनी लिहिले आहे, "जन्मभर मी शाळेत नोकरी करणार नाही. माझ्या भावाचे शिक्षण संपले म्हणजे एकतर निर्वाहापुरते २५ रु. घेऊन शाळेत राहीन. नाहीतर खेडोपाडी जाईन. मला देवाने ६० वर्षे आयुष्य दिले तर ३०-३५ खेड्यांत मी विचारांचा प्रचार करीन." लाहोर स्वातंत्र्याचा ठराव मांडल्यानंतर २९ एप्रिल १९३० रोजी गुरुजींनी शाळेला रामराम ठोकला आणि स्वातंत्र्याच्या चळवळीत निर्भयपणे उडी घेतली. इथून त्यांच्या जीवनाचे दुसरे पर्व सुरू झाले. १९३० मध्ये सत्याग्रहात भाग घेऊन ते तुरुंगात गेले. १९३३ मध्ये नाशीकच्या तुरुंगात 'शामची आई' हे पुस्तक अवघ्या पाच दिवसात लिहिले. फैजपूर कॉंग्रेसचं अधिवेशन यशस्वी करण्यासाठी त्यांनी जीवापाड

कष्ट घेतले. अमळनेरच्या प्रताप मिलच्या टाळेबंदीच्या वेळी गिरणी उघडावी म्हणून गुरुजींनी जलसमाधीची घोषणा केली. पण नंतर सेनापती बापटांनी केलेल्या तडजोडीमुळे गिरणी उघडली व गुरुजींची जलसमाधी टळली. १९३९ च्या किसान मोर्चाच्या वेळेस 'आता उठवू सारे रान । आत पेटवू सारे रान ।' हे स्फूर्तीगीत रचले. १९४२ ते ४५ हा काळ त्यांनी तुरुंगातच काढला. १९४५ साली ते सुटले आणि देश स्वतंत्र झाल्यावर १५ ऑगस्ट १९४८ साली त्यांनी 'साधना' साप्ताहिक सुरू केले. त्यांचे सर्व लेखन समाजोद्धारासाठीच होते. आपल्या कथा-कादंबऱ्यांतही त्यांनी सामाजिक व आर्थिक विषमतेवर कोरडे ओढले आहेत. 'क्रांती', 'सती', 'तीन मुले', 'रामाचा शेला' या त्यांच्या गाजलेल्या कादंबऱ्या. आपल्या अखेरच्या काळात आपली पुतणी सुधाला त्यांनी जी पत्रे लिहिली त्यातून त्यांचे सारे अंतरंग प्रकटले आहे. लेखक, गुरूजी, माणूस या नात्याने ते मोठे होते.

जे आदर्श त्यांनी आपल्या वाङ्मयातून रंगविले तसेच त्यांचे खाजगी वर्तन व आचरण होते. वाङ्मयातल्या निष्ठाशी त्यांनी आपल्या दैनंदिन जीवनात सदैव इमान ठेवले. हरिजनांना मंदिर प्रवेश प्रतिबंध असल्याचे शल्य त्यांना होते. त्यासाठी त्यांनी प्राणांतिक उपोषण आरंभले. एका भाषणात ते म्हणतात, "पंढरपूरचं मंदीर हरिजनांना मोकळं व्हावं म्हणून मी मरायला उभा राहिलो. पंढरपूर म्हणजे महाराष्ट्राचे हृदय. महाराष्ट्राच्या जीवनाची किल्ली. पंढरपूर म्हणजे दक्षिणची काशी." अखेरीस हे मंदीर हरिजनांना खुले करण्यात येईल असे आश्वासन मिळाल्यावर गुरुजींनी आपले प्राणांतिक उपोषण सर्वांच्या आग्रहावरून समाप्त केले. सानेगुरुजींनी प्रपंच केला नाही. 'हे विश्वचि माझे घर' हीच त्यांची जीवननिष्ठा होती. जातपात न मानता माणुसकीचा एकच धर्म मानला. रक्तपात न होता लोकशाही समाजवाद या देशात यावा हे त्यांचे स्वप्न होते. त्यांनी आपल्या तत्त्वज्ञानाविषयी व ध्येयाविषयी पुढील भाष्य केले. "मी जीवनाचा एक नम्र उपासक आहे. सभोवतालचा सारा संसार सुखी व समृद्ध व्हावा, ज्ञानविज्ञानसंन्न व कलामय व्हावा, सामर्थ्यवान व प्रेममय व्हावा हीच मला एक तळमळ आहे. माझे लिहिणे व बोलणे, माझे विचार वा माझी प्रार्थना या एकाच ध्येयासाठी असतात."

देशाला स्वातंत्र्य मिळाले तरी गुरुजी अस्वस्थच होते. त्यांच्या 'साधना' साप्ताहिकाला अद्याप स्थैर्य नव्हते. नंतर गांधीजींचा वध झाला. गुरुजींच्या जीवनातला आनंदच आटला. त्यांचे हृदय विदीर्ण झाले. स्वातंत्र्यानंतर देशाचे चित्र पालटले नाही. पुढाऱ्यांची सत्तालालसा, गांधीजींचा वध, फाळणीनंतरचा मानवी संहार आणि साप्ताहिकाची अस्थिरता यामुळे ते अस्वस्थ असत. याच मनःस्थितीत त्यांनी पुतणीला पत्र लिहिले. त्यात ते म्हणतात, " सुधा, मी तुला जवळजवळ वर्षभर दर आठवड्यास पत्र लिहीत आहे. परंतु, आजचे हे शेवटचे साप्ताहिक पत्र. आता मी तुला केव्हातरी अधूनमधून लिहीन. परंतु आता बंधन नको." त्यांना कोणतीच बंधने नको होती. दिवसेंदिवस गुरुजींचा अस्वस्थपणा वाढतच गेला. डोकेदुखीच्या वेदना असह्य होऊ लागल्या. अखेरीस झोपेच्या गोळया घेऊन त्यांनी आपला अवतार संपविला. रक्तपात न होता लोकशाही समाजवाद या देशात यावा असे स्वप्न बाळगणाऱ्या गुरुजींचे देहावसान दादरला मेघाभुवनात ११ जून १९५० रोजी झाले. आयुष्याच्या अखेरच्या पर्वाची शोकांतिका झाली. आपल्या अंत्यविधीचा भार इतरांवर पडू नये म्हणून खिशात त्यांनी ३० रु. व चिठ्ठी ठेवली होती. " अंगावरच्या कपड्यात न्या. मृताची इच्छा पाळा." गुरुजी गेले तरी त्यांची शिकवण साहित्यातून प्रेरणा देत आहे.

**संध्याराणी नांदगावकर**
बारावी विज्ञान

# विजयदुर्गचे श्रमशिबीर

२५ डिसेंबर ते ३ जानेवारी या दहा दिवसांच्या कालावधीत आमच्या कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत ग्रामीण पुनर्रचना शिबीर पार पडले. आम्ही ५४ शिबीरार्थींनी श्रमदानाने विजयदुर्ग परिसरातील गवत कापून किल्ल्यातील बरेच दिवसांपासून घुसमटलेल्या वृक्षांना मोकळा श्वास मिळवून दिला. हे गाव पाच वर्षांसाठी महाविद्यालयाने यंदापासून दत्तक घेतले आणि दरवर्षी येथे श्रमदान शिबीरे आयोजित करून वेगवेगळी समाजोपयोगी कामे करण्यात येणार आहेत. यंदाचं हे पहिलंच वर्ष होतं.

विजयदुर्गच्या पुण्यभूमीवर आम्ही गेलो तेव्हा मला शिवकालीन इतिहास आठवला. शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेला हा गाव असल्याने इथे काम करण्यात एक आगळाच आनंद होता. विद्यार्थ्यांची राहण्याची सोय प्राथमिक शाळेत केली होती तर मुलींची सोय येथील ग्रामस्थ श्री. तारकर यांच्या घरी केली होती. संध्याकाळी उद्घाटनाचा औपचारिक कार्यक्रम झाल्यानंतर दुसऱ्या दिवशीपासून खऱ्या अर्थाने कामाला सुरुवात झाली. प्रत्येक दिवसाचं आयोजन केलं होतं. त्यानुसार सर्व कामे केली जात. प्रत्येक कामाची वेळ ठरवलेली होती. सकाळी ७-१५ ला प्रार्थना होई. ७-३० वाजता आम्ही किल्ल्यात कामाला जात असू. तिथे बारापर्यंत काम करून पुन्हा निवासस्थानी आल्यानंतर आंघोळ वगैरे उरकून सर्वजण बरोबर एक वाजता जेवायला एकत्र येत होतो. संध्याकाळच्या वेळेत गावाची पाहाणी, चर्चासत्र वगैरे कार्यक्रम होत असत. ७-३० ते ८-३० पर्यंत रात्रीचे जेवण होई व त्यानंतर ठरल्यानुसार मनोरंजनाचे कार्यक्रम होत.

पहिले दोन दिवस आम्ही शिबीरार्थी एकत्र होतो खरे पण मनाने मात्र खूप लांब होतो. केवळ ओळखीच्या नजरेने एकमेकांकडे पहात होतो. पण त्यानंतर जेव्हा ओळखी झाल्या तेव्हा एक सामुदायिक मन तयार झालं. पण प्रत्येकजण प्रत्येकाशी जुळवून घेत होता. गवत कापणीचं काम आम्हाला भर उन्हात करावं लागत होतं. एवढं काम आम्ही बऱ्याच मुलांनी घरीही कधी केलं नव्हतं. काहींना तर विळा हातात कसा धरायचा हेही माहीत नव्हतं. काहींच्या हातांना तर विळा धरून फोडही आले. पण प्रत्येकजण एका वेगळ्याच स्फुर्तीने भारावून गेला होता. काहीजण दोन-तीन दिवस आजारी होते. मात्र घरी परत जायला त्यांची पावलं वळत नव्हती. आजारातून बरे झाल्यावर ती मुलं पुन्हा उत्साहाने कामाला लागत. एकमेकांची थट्टा, विनोद करत. यातून उडणारे हास्याचे फवारेच आमचा उत्साह द्विगुणीत करत होते. रात्री करमणुकीचे विविध कार्यक्रम होत. त्यामुळे दिवसभर उन्हात केलेल्या कामाचा विसर पडे. आमच्याबरोबर गावातील लोकही त्याचा आस्वाद घेत. गावातल्या सर्व नागरिकांनी वेळोवेळी आम्हाला खूप मदत केली.

रंगीबेरंगी फुलपाखरे मनाला भुरळ घालून लगेच नजरेआड व्हावीत तसा एकेक दिवस कमी होऊ लागला आणि शिबीराची अखेर उजाडलीही. हातात बॅग लटकावून आणि अनुभवांची भरगच्च शिदोरी घेऊन आम्ही परतलो ते पुढील वर्षी जाण्याचे ठरवूनच.

**सीमा मोंडकर**

द्वितीय वर्ष कला

# विज्ञानयुगात आध्यात्माचे महत्त्व

भारतीय आध्यात्म हे परिपूर्ण शास्त्र आहे. प्राचीन ऋषीमुनींपासूनचा इतिहास त्यामागे आहे. सत्ययुगापासून आज कलीयुगापर्यंत सर्वजण आध्यात्माचा कोणता ना कोणता मार्ग स्वीकारत असतो. सत्ययुगात माणसे ध्यानाला बसत. तासन् तास किंवा वर्षांनुवर्षे ध्यानधारणा त्याकाळी शक्य होती. शिवाय आयुष्यही ४०० वर्षांचे होते. कृतयुगात होमहवन केले जाई. त्यानंतर त्रेतायुगात देवतांची पूजाअर्चा केली जाई. म्हणजे प्रत्येक युगात साधनेचे नेमके असे स्वरूप होते व त्यायोगे मोक्ष मिळविला जाई. आता कलीयुगात काय ? तर कलीयुगात मी नामरूपाने असेन असे भगवंतानेच सांगितले आहे.

प्रत्येक व्यक्तीच्या जीवनातील सुखदुःखाचा आढावा घेतला तर सुखापेक्षा दुःखच जास्त आहे. एकूण दुःखापैकी ३० टक्के शारीरिक आणि ७० टक्के मानसिक असतात. प्रत्येक दुःखाचे निराकरण करण्यासाठी आपण डॉक्टरांकडे धाव घेतो. मग ती अर्धशिशी असो, पाठीच्या कण्याचा त्रास असो, ब्लडप्रेशर वाढणे असो किंवा अभ्यास करूनही लक्षा न राहणे असो. आपल्या प्रत्येक दुःखावर डॉक्टरांकडे रामबाण औषध आहे अशी आपली धारणा असते. परंतु वैद्यकीय महाविद्यालयातून दिल्या जाणाऱ्या शिक्षणात फक्त १० टक्के वेळ मानसिक तर ९० टक्के वेळ शारीरिक आजारासंबंधीच्या शिक्षणासाठी दिला जातो. त्यामुळे डॉक्टरांना शारीरिक विकारासंबंधी जास्त माहिती होते आणि आपला विकार जर शारीरिक नसेल तर डॉक्टरी उपचारानेसुद्धा गुण न आल्याचे अनुभव आपल्याला येतात.

शरीराचा किंवा मनाचा विकार दोन प्रकारात मोडतो. बुद्धीच्या आधारे समजून घेता येणारे विकार बुद्धीजन्य आणि बुद्धीच्या कक्षेत न समजणारे विकार बुद्धीअगम्य असतात. आपल्या ३० टक्के व्याधींची कारणे बुद्धीच्या आधारे शोधता येतात. पण ७० टक्के व्याधी बुद्धीअगम्य असतात. शारीरिक व्याधींच्या तुलनेत मानसिक दुःखाकडे दुर्लक्ष होत असल्याने त्याची कारणेही सापडत नाहीत, उपचारही होऊ शकत नाहीत. परिणामी आपण जास्तच दुःखी होतो.

मनोविकारांचे एक प्रमुख कारण म्हणजे स्वभावदोष. स्वभावातील दोष अंतर्मनात असतात. संमोहन उपचारांनी ते नाहीसे करता येतात. बुद्धीअगम्य कारणात १) भूतबाधा, करणी, पूर्वजांचे अतृप्त आत्मे, ग्रहपीडा, नशीब २) कुलदेवता, ग्रामदेवता, स्थानदेवता व वास्तुदेवतेचा प्रकोप, ३) कुंडलिनीतील चक्र किंवा नाडीत अडथळा येऊन शरीरातील प्राणशक्तीचे वहन नीट न होणे, ४) प्राणशक्तीच कमी असणे, ५) अन्न, कपडे, दिशा, वगैरेंचा परिणाम अशी बुद्धीअगम्य कारणे डॉक्टरांना समजत नसल्याने हजारो रुपये खर्च करूनही आपण व्यथीत राहतो. बुद्धीला न समजणाऱ्या या कारणांकडे विज्ञानयुगात वावरणारे आपण थोतांड म्हणून पाहतो. त्यामुळे त्यावर योग्य उपचार करण्याकडे आपला कल नसतो किंवा मंत्रतंत्र करून उपजीविका करणाऱ्या लोकांनी समजाला इतके लुबाडले आहे की, या सर्वाला आपण अंधश्रद्धा म्हणू लागतो.

बुद्धीला अगम्य असलेल्या गोष्टीचा शोध घेणे हा विज्ञानाचा हेतू आहे. परंतु, शोध घेण्याची दिशा चुकीची असल्याचे जाणवते. विज्ञानातील संशोधनाचे आजचे स्वरूप पाहाता जाणवते ते असे की, जडाच्या माध्यमातून आपण सूक्ष्म समजून घ्यायचा प्रयत्न करीत आहोत. उदा. किलोच्या माध्यमाने ग्रॅम मोजता येत नाही. पण ग्रॅमच्या माध्यमाने किलो मोजता येते. किलोच्या माध्यमाने ग्रॅम मोजले तर जसे हाती काहीच

लागणार नाही तसेच जडाच्या माध्यमातून सूक्ष्म शोधले तर काहीच मिळणार नाही. हीच विज्ञानाची मर्यादा होय. आपल्या विकारांची सूक्ष्मातली कारणे समजून घ्यायची असतील तर सूक्ष्मतर व्हावयास हवे. सर्वांत सूक्ष्म म्हणजे आत्मतत्त्व. ते समजले तर त्याहून जड अशा शरीर व मनाचे सर्व प्रश्न, विकार, व्याधी समजू शकतात. यालाच आपण सर्वज्ञान म्हणतो. यासाठी वैयक्तिक साधना आवश्यक असते.

जगातल्या सर्व ग्रंथांमध्ये एकत्रित झालेले ज्ञान फक्त २ टक्के आहे आणि ९८ टक्के ज्ञान साधनेने मिळविता येते. कलीयुगात आपल्या कुलदेवीचे अखंड नामस्मरण हीच श्रेष्ठ साधना आहे. नामाची कास धरा कारण नामच सर्व काही आहे असे संतांनी सांगितले आहे. नाम अगोदरच होते आणि आहे. आणि आपल्या नंतरही राहाणार आहे. ज्ञानी, योगी किंवा भक्त यांचे मार्ग कितीही भिन्न असले तरी नाम हा तिघांचाही पाया आहे. ज्ञानयोग्याला नामानेच ज्ञान मिळते. नाम घेता घेताच चित्तवृत्ती स्थिर होऊन योग्याची समाधी लागते. आपल्या कुलदेवीचे नाव अखंड घेतल्यास त्याचा होणारा फायदा म्हणजे यम-नियमांचे पालन करून चित्तवृत्तींचा निरोध करण्यास फार काळ लागू शकतो. कारण चित्तावर प्रकृतीतील कोट्यावधी संस्कार असतात व एकेक संस्कार घालवायलासुद्धा फार वेळ लागतो. प्रकृतीतील संस्कार घालविण्यासाठी प्रयत्न करण्यापेक्षा पुरुषाशी एकरूप होण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे हे जास्त महत्त्वाचे आहे. हेच कुलदेवीच्या नामस्मरणाने साध्य होते. मन, बुद्धी, चित्त वगैरे प्रकृतीचे घटक त्यांच्या गुणाप्रमाणे कार्य करीत असतात. त्यांच्याशी विरोध करण्यात आपली साधना खर्च करण्यापेक्षा, कुलदेवतेकडे जाण्यासाठी म्हणजे नामाशी एकरूप होण्यासाठी वापरली, तर ध्येय लवकर साध्य होते. नामजप चालू असताना तेवढा वेळ तरी चित्तावर इतर गोष्टींचे संस्कार होत नाहीत. चित्तावर इतर संस्कार होऊ नयेत यासाठीचा जागृतावस्थेतील उत्तम मार्ग म्हणजे नामस्मरण होय. नामस्मरण चालू असताना चित्तातील वासनाकेंद्र, आवड-नावड केंद्र, स्वभावकेंद्र व बुद्धीकेंद्र या केंद्रांतील संस्काराकडून येणाऱ्या संवेदना बाह्यमन स्वीकारीत नाही. असे सातत्याने जास्त काळ झाले की चित्तातील केंद्रामधील संस्कार कमी व्हायला लागतात. आध्यात्मशास्त्रदृष्ट्या देवतेचा जप केल्यास ती देवता प्रसन्न होते. कुल म्हणजे मुलाधारचक्र. कुल अधिक देवता म्हणजे ज्या देवतेची उपासना केल्यावर मुलाधारचक्र जागृत होते, म्हणजे आध्यात्मिक प्रगतीला सुरुवात होते, तिला कुलदेवता म्हणतात. कुलदेवतेच्या उपासनेची सुरुवात वेदोत्तर व पुराणपूर्व काळात झाली. ब्रह्मांडात असलेली सर्व तत्त्वे पिंडात आली की, साधना पूर्ण झाली असे होते. ब्रह्मांडात असलेल्या सर्व देवतांच्या स्पंदन लहरी जशा सर्व प्राण्यांत फक्त गाईत येऊ शकतात म्हणूनच गाईच्या पोटात तेहतीस कोटी देव असतात असे म्हणतात. तसेच ब्रह्मांडात असलेल्या सर्व तत्त्वांना आकर्षित करून त्या सर्वांची ३० टक्के एवढी वाढ करण्याचे सामर्थ्य कुलदेवतेच्या जपात आहे. कुलदेवतेची साधना करून आध्यात्मिक व व्यावहारिक प्रगती केल्याचे हल्लीच्या काळातील एक सर्वज्ञात उदाहरण म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. एकाच जागी बसून नामस्मरण करण्यापेक्षा सर्व कामे करीत असताना नामस्मरण करणे ही जास्त श्रेष्ठ प्रतीची साधना आहे. कारण त्यात एकतर साधना अखंड चालू राहते व दुसरे म्हणजे आपण व्यवहारातील कामे करीत असताना म्हणजे मायेत असताना, अखंड नामस्मरणाने मायेत असूनही नसल्यासारखे असतो. अशा तऱ्हेने सर्व स्थितीत भगवंताशी अनुसंधान साधून राहणे यालाच सहजस्थिती असे म्हणतात.

भारतीय आध्यात्माला असा इतिहास आहे. त्या त्या युगात साधनेचे स्वरूप वेगळे होते. आज कलीयुगात आपण योग्य साधना केली तर आपल्या ज्या व्याधींचे कारण आध्यात्मिक आहे त्या कमी झाल्याचा अनुभव आपल्याला येतो. आध्यात्म हे अनुभूतीचे शास्त्र आहे. केवळ पुस्तके वाचून हे समजणार नाही तर प्रत्यक्ष कुलदेवीचे नाम घेऊ लागलो की, पृथ्वी, आप, तोज,

वायू, आकाश ही पंचतत्वे नियत्रीत केली जातात आणि त्यामुळे अकारण संतापणे, दुसऱ्याला कमी लेखणे, पैशाचा गर्व असणे असे आपल्यातील दोष पहिल्या टप्प्यात कमी झाल्याची अनुभूती आपल्यालाच येऊ लागते.

तासन्तास अभ्यास करूनही लक्षात न राहणे किंवा अभ्यास केलेला परीक्षेच्या वेळेस काहीच आठवत नाही. असे त्रास बऱ्याचवेळा आध्यात्मिक असतात. केवळ कुलदेवीच्या नामाने अशा समस्या कमी होऊ शकतात आणि आपण आनंदी होऊन इतरांच्या जीवनातही आनंद निर्माण करू लागतो.

**मीनल दातार**

तृतीय वर्ष विज्ञान

# कविता

## एक अश्रू

अणकुचीदार खडी,
खडीची बोच,
मातेच्या डोळ्यांतून,
अश्रूंचा पूर,
भरून आलेला ऊर . . .
स्तनातून स्त्रवलेले,
दुधाचे दोन थेंब,
अन् . . .
फाटलेल्या पदराखाली
बाळाचं प्रेत !

**सुरेश कदम**
प्रथम वर्ष वाणिज्य

## अनपेक्षित

घडले सारे सारे अघटित
सूर्य होण्याआधी प्रकटीत ।
वाटले नव्हते स्वप्नात
भूकंप होईल क्षणात ।।
नव्हती कल्पना कुणाला
स्वर्गातल्याही यमाला ।
प्रेते पडली दारोदार
भूकंपाने केला हाहाकार ।।
काय अवस्था त्या लोकांची
आधार तुटल्या आईबापांची ।
पोराबाळांची वाताहत
संसाराची राखरांगोळी ।।
का जगावे कुणासाठी
सुकाणू तुटलेल्या होडीसारखी ।
राहिला नाही कोण कुणासाठी
सांत्वन करून रडण्यासाठी ।।
माणसाची झाली वाताहत
निद्राधीन झाली भूकंपात ।
धरणी झाली भूकंपीत
मृतमय झाली अगणित ।।

**विठू प्रभू**
अकरावी कला

## तोडलेस तू उमलते फूल

जन्म घेतला तुझ्याच पोटी
काय केलेस तू आमुच्यासाठी
जन्म घेतला ही झालीच भूल
तोडलेस तू उमलते फूल ।।१।।

जन्म देऊनी काय केले
धरणीच्या पोटी सारे गेले
नाही राहिले छोटे मूल
तोडलेस तू उमलते फूल ।।२।।

क्रूर काळाने घात केला
किल्लारी गाव ओसाड पडला
फक्त राहिली जमिनीची धूळ
तोडलेस तू उमलते फूल ।।३।।

का रे दैवा केलास घात
पाहिलेही नव्हते कुणी स्वप्नात
नाही केलीस प्रार्थना कबूल
तोडलेस तू उमलते फूल ।।४।।

**मंगल हिंदळेकर**
बारावी कला

## फुलांचे झाले अश्रू

कहाणी या जीवनाची,
नेत्रात भरलेल्या आसवांची,
होरपळलेल्या या जीवन-व्यथेची,
न भूतो, न भविष्यती; अशा कल्पनेची . . .
त्या संसारात गरिबी हे वरदान होते खरे,
आशावादी स्वप्नांनी आक्रमित होते जीवन सारे,
ती स्वप्ने होती उमलत्या फुलांची,
स्वप्ने ती स्वप्नेच झाली,
मात्र फुले धुळीस मिळाली.
आता त्या फुलांचे झाले अश्रू
त्या अश्रूंच्या नशिबी नव्हती उद्याची पहाट
म्हणूनच का मायभूने केला हा घात ?
आई, चुकली तुझी लेकरे,
त्यांना करता आली नाही मात.

**संदीप डोळकर**
अकरावी कला

## खेळ नियतीचा

अनंतचतुर्दशी दिनी सूर्य गेला अस्तासी
सारी किल्लारी जनता निद्राधीन जाहली
कोणासही कल्पना नव्हती,
क्रूरकाळ आला आपल्या जवळी
धरणीने रौद्ररूप धारण केले
किल्लारी गाव कुशीत घेतले.
निद्राधीन जनता चिरनिद्राधीन जाहली.
कर्ताकरविता तो विघ्नेश्वर
नव्हता तेव्हा या भूवर ?
प्रश्न पडतो जनमानसा
नियतीचा हा खेळ असा
कोण आहे वाली त्या अनाथांचा ?

**प्रफुल्ल राणे**
बारावी कला

## शांततेचा दूत

आज माझ्या अनुभवांची शिदोरी,
केवळ तुमच्यासाठीच खुली करतोय.
म्हणून माझ्या बांधवांनो
जागृत रहा । शांत रहा ।
भ्रष्टाचाराने बरबटलेला अन्
विषमतेच्या किडीने कुरतडलेला देश
आज बळकट करण्याचा प्रयत्न करतोय
म्हणून माझ्या बांधवांनो
जागृत रहा । शांत रहा ।
एका हाताने मी शांतीचे निशाण फडकवतोय
अन् दुसऱ्या हाताने धर्मग्रंथ दाखवतोय
म्हणून माझ्या बांधवांनो
जागृत रहा । शांत रहा ।
आज माझ्या छातीवर
धर्माची प्रतीके मी मिरवतोय,
अन् खांद्यावर अधर्माचे चिन्ह.
अधर्म मोडण्यासाठीच आलोय.
